म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. ३७८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
संग्रहालय/वाचनालय शाखा.

अनुक्रम नं. | विभाग निबं | क्रमांक
पुस्तकाचें नांव
लेखक वि. पां. दांडेकर.
सूचना—पुस्तक आठ दिवसांवर ठेवूं नका. पुस्तकाची खराबी करूं नका.

REFBK-0005712

# वेडी आशा

आपल्या कांहीं कांहीं आशा वेड्याच असतात नाहीं तर काय ! आतां माझेंच पहाना. रोज पोस्टमनाची मी आपला आतुरतेनें वाट पहात असतों. मीं कोणाला पत्र पाठविलेलें असतें, आणि त्या पत्राची मी वाट पहात असतों, असें मुळींच नाहीं. मी कोणी संपादक, वकील, पुढारी, अधिकारी किंवा रूपवती स्त्री नाहीं कीं मला लोकांनीं पत्रें पाठवून आपल्या आशा-आकांक्षा कळवाव्यात. एके काळीं मला कांहीं मंडळींकडून पत्रें येत असत. पण त्याला कारण मी त्यांना पत्रें घालीत असे. त्या काळीं मला चांगलें आठवतें, मी फार उत्कंठेनें टपालाची वाट पहात असे. एखाद्या मेघदूताप्रमाणें किंवा

हंसाप्रमाणें पोस्टमन मला त्या वेळीं वाटे. कित्येक वेळां मी पोस्टांतहि गेलेलों आहे. आणि गुलाबी किंवा हिरव्या रंगाचें पार्कीट टपालीच्या हातांत दिसतांच माझ्या अंगांतून निघालेल्या गोड झिणझिण्यांचाहि अनुभव मीं घेतलेला आहे. पण आतां सारीच परिस्थिति बदलली आहे. महत्वाच्या कामांखेरीज मी कोणालाच सहसा पत्र पाठवीत नाहीं. त्यामुळें पत्राची अपेक्षा करण्याचाहि मला वास्तविक अधिकार नाहीं. पण मौज ही कीं सकाळ झाली म्हणजे माझी आपली इच्छा असते कीं पोस्टमनानें आपल्या दारांत चार दोन तरी पत्रें आणून टाकावींत. पोस्टमन एकदां येऊन पत्र न देतांनाच गेला कीं मला बरेंहि वाटतें आणि वाईटहि वाटतें. बरें वाटतें एवढ्या-करितां कीं, लागला एकदांचा निकाल मनांत धरलेल्या आशेचा. आणि वाईट वाटतें एवढ्याकरितां कीं तो अनुकूल लागला नाहीं. असल्या या आशेला तुम्ही वेडीच म्हणाल, दुसरें काय ?

एका जगप्रसिद्ध कथालेखकानें एक गोष्ट लिहिली आहे. त्या गोष्टींतील नायिकेला, नायकाला दररोज येणाऱ्या अनेक प्रेमपत्रिकांचा हेवा वाटून काय करावें तें सुचेना. नायकाच्या प्रेमाचा प्रवाह आपल्या दिशेनें वाहू लागावा, आपणहि कोणी मोठ्या आहोंत असें त्याला वाटावें, म्हणून तिनें एक युक्ति केली. ती रोज स्वतःच

स्वतःला पत्रें लिहूं लागली! आणि पोस्टमन आला कीं दाराशीं उभी राहून व नायकाच्या खोलीकडे पाहात



'माझें पत्र आहे का?'

मुद्दामच ती 'माझें पत्र आहे का?' म्हणून विचारी आणि मग आपलें पत्र घेऊन व पुनः एकवार नायक बाहेर आला असल्यास त्याच्याकडे बघत हंसत हंसत व कांहींशा रागारागानें जोरानें दार बंद करून आंत जाई. नायकाचें मन वळवून घेण्याचा प्रयत्न करणाऱ्या या आशेला तुम्ही वेडीच आशा म्हणाल; दुसरें काय?

माझ्या माहितींतील एक सद्गृहस्थ आहेत. ईश्वराच्या कृपेनें त्यांना कांहीं मुली असून, त्या सर्व अष्ट नायिकांच्या प्रकारांत बसण्याइतकी रूपसंपदा देवाकडून घेऊन आल्या आहेत, असें त्यांना वाटतें. इतकेंच नाहीं, तर या भावनेनें ते इतके पछाडले आहेत कीं ' माझ्या मुली कोणीहि आनंदानें येऊन मागणी घालून घेऊन जाईल ' अशी उमेद उराशीं बाळगून त्यांनीं गेलीं पंधरा वर्षें फुकट घालविलीं आहेत. त्या मुलींच्या जोडीला दहा दहा हजारांचें बक्षिस लावलें, तरी देखील त्यांना आनंदानें घेऊन जाण्याची कोणाचीहि हिंमत व्हावयाची नाहीं. असें असतां त्या बहाद्दर जीवाच्या आशेला तुम्ही काय म्हणाल ?

संस्कृत सुभाषितांत एका भ्रमराची फार सुंदर गोष्ट सांगितली आहे. कमलकोषांतील मकरंदाचा आस्वाद घेण्यांत देहभान विसरलेल्या भ्रमराला कळलें देखील नाहीं कीं, पृथ्वीनें काळोखाचा बुरखा धारण केला असून, कमळाच्या पाकळ्या मिटूं लागल्या आहेत. आणि जेव्हां कळलें तेव्हां देखील कमळावर निहायत खूष असलेल्या भ्रमराच्या तोंडून उद्‌गार निघाले ते असेः— रात्र ही केव्हांच संपेल आणि सुप्रभात होईल. सूर्यनारायण एकदां उगवला कीं माझें कमळ हंसल्यावांचून राहील काय ? त्या बिचाऱ्या भ्रमराचें पुढें काय झालें हें आपणाला ठाऊक असेलच. वेडी आशा ! दुसरें काय ?

५०१५८

## वेडी आशा

मी बाहेर कुठें फिरायला गेलेलों असलों आणि फिरून घरीं परत आलों कीं प्रथम आधाशाप्रमाणें टेबला-पाशीं जातों आणि पाहतों कोणाची कांहीं चिठ्ठी-चपाटी आली आहे कीं काय ! आपल्या पश्चात् पुष्कळ लोक घरीं येऊन आपली विचारणा करून गेलेले असावेत, अशी माझी इच्छा असते. निदान त्यांनीं कामाच्या चिठ्ठया तरी ठेवून जाव्यात असें मला वाटतें. पोस्ट-मनाची वाट पाहण्यासारखीच ही वेडी आशा आहे; दुसरें काय ?

पण कांहीं कांहीं आशा यांपेक्षां वेगळ्या असतात. अपेक्षेवर उभारलेल्या असतात त्या. त्यांना कांहीं कोणी वेड्या आशा म्हणणार नाहीं. उदाहरणार्थ, पाठविलेल्या पत्रांची किंवा लेखांची वाट पहाणें, बोलावलेल्या व्यक्तीच्या वाटेकडे डोळे लावून बसणें, पहिल्या तारखला किंवा इतर ठराविक तारखेला पगाराचा विचार मनांत येणें, परीक्षा संपल्यावर अमुक पेपरमध्यें इतके मार्क मिळतील यांविषयीं चर्चा करणें, अजाण अर्भक सोडून पति वारला असल्यास पत्नीनें त्या अर्भकाविषयीं सुखस्वप्नें रचणें, दानधर्म केला असल्यास किंवा अधिकाऱ्यांना मानपान दिला असल्यास रावबहादुरीकरितां बादशहाच्या वाढदिव-साची वाट बघणें, आपल्याकडे पुरुषांनीं आणि आपल्या दागिन्यांकडे स्त्रियांनीं लक्ष दिलें किंवा नाहीं याची

काळजी युवतींनीं वाहणें, उलट आपल्या आजतागायत वेषभुषेकडे किती कामिनींनीं बघितलें याची मोजदाद तरुणांनीं करणें, शेतांत उभ्या असलेल्या पिकाकडे पाहून शेतकऱ्यांनीं सुखाची आशा बांधणें, वगैरे वगैरे. आशेचे हे प्रकार स्वाभाविक असून त्यांत कोणालाच वेडेपणाचा अंश आढळणार नाहीं. मुळांत कांहीं अनुकूल परिस्थिति असल्यावर रचलेल्या आशेच्या मनोऱ्यांत कांहींच वावगें नसतें. ग्रीष्म ऋतूंत रखरखीत ऊन पडत असतांना संध्याकाळीं पश्चिमेकडे एखादा मेघाचा ठिपका दिसल्यास तेवढ्यावर मुसळधार पाऊस आतां कोसळेल, अशी आशा बाळगणाऱ्यालाहि भलतीच आशा करतो आहे, असें म्हणतां येणार नाहीं.

आणि तसेंच पाहिलें तर वर उल्लेखिलेल्या वेड्या आशेंत देखील वावगें तें काय ? तितका वेळ तरी त्या त्या मंडळींना आनंद होतो ना ? आशा सबळ परिस्थितीवर उभारलेली असो वा नसो, वेडी असो वा शहाणी असो, परिणाम सारखाच. किंबहुना आशेसारखा उत्तेजक पदार्थ नाहीं असें ह्मटलें तरी चालेल. आशेचें मद्य पिणाऱ्याला परिस्थितीची विषमता कधींच भासत नाहीं. दुस्थितीच्या काळ्याकभिन्न मेघांवर आशेची रुपेरी कडा चमकत असते, ह्मणूनच परिस्थितीच्या सहारा वाळवंटांतून वाट चालत असणाऱ्या मुशाफिराला त्याचें कांहींच वाटत

नाहीं. चेंडू कितीहि जोरानें खालीं फेंकला तरी तो वर वर यावयाचाच. उलट जोर जितका जास्त तितकी त्याची उडी उंच. आशेचें असेंच असतें. ती दबली जात नाहीं; मरत नाहीं. द्रौपदीला श्रीकृष्णानें दिलेल्या स्थालीची अशी गोष्ट सांगतात कीं ती कधींच रिकामी होत नसे. नेहमीं षड्रस अन्नानें भरलेली ! आशेचा पेला ज्यांना आपल्या ओंठांना लावतां आला ते धन्य होत. कारण तो देखील कधींहि रिकामा होत नाहीं.

गौरीहर पुजणाऱ्या नवऱ्या मुलीच्या आतुरतेनें आणि आनंदानें मी रोज उगवणाऱ्या दिवसाकडे बघत असतों. सकाळीं उठल्याबरोबर जर पुर्वेकडील आकाशांत गुलाबी रंगाच्या छटा दिसल्या तर पुसायलाच नको. माझी खात्रीच असते कीं तो दिवस आनंदांत जाणार. तीच तऱ्हा मोहोरानें बहरलेल्या आम्रतरूंकडे पाहिलें किंवा दुरून येणाऱ्या कोकिळाचें आल्हाददायक कूजन ऐकलें कीं माझी होते. नवीन येणाऱ्या वर्षाचें देखील असेंच. मागच्या वर्षाचा आढावा न काढतां, दोन्ही हात पसरून मी नव्या वर्षाकडून मिळणाऱ्या सुंदर वस्तूंचीच वाट पहात असतों. आशेनें पसरलेल्या ओंजळींत काळ कांहींतरी टाकल्याखेरीज कधींच रहात नाहीं.

आशेवर प्रेम मात्र उत्कट मनानें करतां आलें पाहिजे. एका आशेखेरीज मनाला कुठलाहि छंद लागतां

कामा नये. कारण त्या बाबतींत आशा मोठी मत्सरी आहे. आपल्या प्रियकरानें दुसऱ्या कोणाच्याहि नादीं लागूं नये, असें तिला वाटतें. याला तुह्मी पाहिजे असल्यास वेड ह्मणा. परंतु जे आशेच्या आराधनीं लागले आहेत, ज्यांनीं आशेचें अधरामृत प्राशन केलें आहे, त्यांना मात्र, आशा ही वेडी आहे, असें मुळींच वाटत नाहीं. आणि केव्हांहि झालें तरी प्रियकरांनीं, आप्त जनांनीं दिलेला निर्वाळाच खरा मानावयाला नको का ?

# दर्शनी राग

'रागावल्यानं होतंय काय ? आपल्या मनाला मात्र त्रास होतो.' सेवानिवृत्त (रिटायर्ड) असे एक न्यायाधीश एकदां मला ह्मणाले. उभ्या आयुष्यांत ते कधींहि कोणावर रागावलेले नव्हते. समोरच्याचा अपराध कितीहि भयंकर स्वरुपाचा असो, त्यानें त्यांची कितीहि आगळीक केलेली असो, त्यांची शांति ह्मणून कधीं ढळली नाहीं. आणि तसें पाहिलें तर हेतुपुरस्सर ते रागावत नसत. रागावल्यानें आपल्याच मनाला त्रास होतो, ह्मणून रागवावयाचें नाहीं, असें त्यांनीं जीवनसूत्र बनविलें होतें. आणि ते त्याबर-हुकूम वागत असत. धंदा न्यायदानाचा असल्याकारणानें वकिलांचे वेडेवांकडे प्रलाप त्यांना ऐकावे लागत. सामान्य

मनुष्याच्या चित्तांत अगदीं क्षोभ उत्पन्न होईल, अशा प्रकारचें विवेचन कुशल कायदेपंडित त्यांच्यासमोर करीत. कित्येक वेळां सबंध केसच अशी कांहीं सांगत कीं, ऐकणाराच्या मनांत गोंधळ होऊन त्यानें आपल्या बाजूनें मत द्यावें, परंतु अशाहि वेळीं त्यांच्या चेहऱ्यावर कुठल्याहि भावनेची रेषा उमटत नसे ! वकील मंडळींना रागावणारा न्यायाधीश आवडतो; कारण त्यामुळें आपण दावा जिंकणार किंवा हरणार हें त्यांना सहज समजतें. मनांतलें बाहेर कांहींहि न दाखविणारा जज्ज हा वकिलांना फारसा प्रिय नसतो. कारण त्याच्या रागालोभाचा त्यांना पत्ताच लागत नाहीं. वर सांगितलेले न्यायाधीश दुसऱ्या वर्गांत मोडणारे होते. अगदीं शांतिब्रह्म होते ते. त्यांच्या मतानें रागावणें हें नेहमींच वाईट होय. दूषित हवेचा जसा आजूबाजूच्या लोकांवर अनिष्ट परिणाम घडतो, तसेंच रागीट मनुष्याच्या भोंवतालच्या मंडळींना त्याच्या अकारण रागाचे दुष्परिणाम भोगावे लागतात. शिवाय आपल्या मनाला त्रास होतो तो वेगळाच. आपलें मन शांतपणें कुठल्याहि गोष्टीचा विचार करूं शकत नाहीं. राग हा मांगाप्रमाणें (जुन्या म्हणीचा उपयोग करणें झाल्यास) ताज्य, अस्पृश्य समजावा. एका गुजराती म्हणींत, राग आला असतांना मनांतल्या मनांत शंभर अंक मोजावेत आणि मग काय करावयाचें असेल तें करावें, असें जें सांगितलें आहे

त्याचाहि अर्थ असाच कीं, रागाच्या वेळेला मनुष्य नीटपणें विचार करण्याच्या स्थितींत नसतो.

रागामुळें आत्यंतिक परिणाम कसे घडतात याचें कांहीं दिवसांपूर्वी प्रत्यंतर पहावयास सांपडलें. एक मुसलमान शेतकरी होता, आणि त्यानें आदल्या दिवशीं धान्य विकून पैसे घरांत आणलें होतें. पांचशे रुपयांच्या नोटा त्यानें आपल्या बायकोजवळ ठेवायला दिल्या होत्या. त्या माउलीनें नोटाचें पुडकें कोणाला दिसणार नाहीं अशा बेतानें, अडगळीच्या जागीं कोंबून ठेवलें होतें. इतक्यांत मौज अशी झाली कीं, त्यांचें रांगतें मूल फिरत फिरत त्या पुडक्याजवळ आलें; आणि त्यानें तें खेळण्याची वस्तु समजून आपल्या हातांत घेतलें. पुढें तें मूल चुलीजवळ गेलें आणि कुतूहलानें त्यानें तें पुडकें अग्निनारायणाच्या स्वाधीन केलें. झालें, पुडक्यांतून निघणाऱ्या ज्वाळा पाहून मुलाला गंमत वाटली. तें टाळ्या वाजवूं लागलें. इतक्यांत शेतकरी तेथें आला. सारा प्रकार त्याच्या ध्यानांत आला. वर्षाची मेहनत फुकट गेली असें त्याला वाटलें, आणि तो इतका क्रोधविवश झाला कीं, त्यानें तें कोंवळें मूल घेऊन रागानें धडाडणाऱ्या चुलींत फेंकून दिलें ! मुलाची आई जवळ येऊन त्याचा राग शांत होईपर्यंत तिकडे मुलाचा निकाल लागला ! आणि हें सर्व कशामुळें झालें ? तर क्रोधामुळें, रागामुळें ! रागवावयाचें नाहीं, असें आमचे न्यायाधीशसाहेब म्हणतात तें एवढ्यामुळें.

पण मग याचा अर्थ मुळींच कोणीं कधीं रागावूं नये, असा का करावयाचा? रागावणें ही तर सहज भावना आहे. तिचा का नायनाट करावयाचा? अजिबात राग मनुष्यानें सोडला तर त्याचा निभाव तरी जगांत लागेल का? धर्मराज हे शांतिब्रह्म होते; पण त्याचमुळें ना पांडवांना मानहानीचे प्रसंग सहन करावे लागले? त्यांच्या शांतीचा काय मोठा फायदा त्यांना मिळाला? असाहि प्रश्न विचारतां येण्याजोगा आहे.

नारद आणि वासुकी यांची अशा आशयाची एक गोष्ट सांगतात. नारदानें एकदां वासुकीला सांगितलें, " तुह्मी सर्प येरव्हीं चांगले; पण फूत्कार टाकून लोकांना चावतां. तुह्मी राग टाकाल तर तुमच्यासारखे भगवद्भक्त नाहींत." झालें. नारदमुनींचें वचन ऐकून वासुकीनें सर्व सर्पांना न रागावण्याची आज्ञा केली. त्याचा परिणाम असा झाला कीं, लोकांच्या पायाखालीं ते तुडवले जाऊं लागले. ( मद्रासच्या बाजूला रस्त्यावर लोळत पडणारे व पायाखालीं तुडविले जाणारे साप हे याच प्रकारचे असावेत असें वाटतें. ) लोकांचा त्यांना त्रास होऊं लागला. तेव्हां वासुकीनें मुद्दाम नारदमुनींची गांठ घेऊन बदललेल्या करुणाजनक परिस्थितीची हकीकत सांगितली. नारदमुनींनाहि मोठा विचार पडला. आणि शेवटीं त्यांनीं एक युक्ति काढली. ते ह्मणाले, " सर्पांना ह्मणावे चावूं

स.ग्री. ८०२



नये, नुसता फूत्कार टाकावा." वासुकीनें हें नवें फर्मान सर्पांना ऐकविलें. आणि तेव्हांपासून आजतागायत त्यांच्याकडून कांहीं कुरकूर नाहीं.


फूत्कार टाकावा पण चावूं नये, ह्या नारद-मुनींच्या वचनांत रागावण्याची सारी मीमांसा, वेदान्त, हीं सांठविलीं नाहींत असें कोण ह्मणेल ? रागावण्याचें सोंग करावें, खरें रागावूं मात्र नये, असाच सोप्या भाषेंत त्याचा अर्थ होय. भावबंधनांतील धुंडिराजानें आपण दर्शनी राग आणतों मधून मधून, असें जें सांगि-तलें आहे तेंच खरें. दर्शनी रागापासून फारसें कोणाचें नुकसान न होतां कार्यसिद्धि मात्र हटकून होते.

आमचे एक हेडमास्तर होते. ( आतां ते स्वर्ग-वासी झाले आहेत. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांति देवो ! ) त्यांचा राग असाच दर्शनी होता. मनांतून ते फार प्रेमळ होते; पण वरकरणीं जमदग्नीचें सोंग आणीत. आणि कित्येक वेळां कृतीहि करीत. पण अंत मात्र प्रेमाची गंगा वाहत असे. एकदां मला शाळेंत जायला थोडासा उशीर झाल्यामुळें मीं भीतभीत शाळेच्या आवारांत प्रवेश केला. आमचे साहेब हातांत छडी घेऊन त्यांच्या शिर-स्त्याप्रमाणें फिरत होते. त्यांनीं मला पहातांच हात पसरायला सांगून एक छडी मारली. मीं ' सर सर ' ह्मणून कांहीं सबब सांगणार, तोंच दुसरी छडी हातावर

येऊन आदळली ! मला त्या वेळीं त्यांचा खूप राग आला. पण संध्याकाळीं शाळा सुटल्यावर जेव्हां त्यांचा प्रेमळ हात हलकेंच माझ्या खांद्यावर पडला, तेव्हां मला त्यांची थोरवी कळली. त्यांच्या रागांतील मर्म समजलें. आमच्या हेडमास्तरांच्या दर्शनी रागानें शाळेंतील वातावरण पाहिजे तेव्हां गंभीर व पाहिजे तेव्हां खेळकर बनत असे.

आणि तमाच विचार केला तर रागाचे सर्वच प्रकार कांहीं वाईट नसतात. कांहीं प्रकार गंमतीचे असतात, तर कांहींत काव्य ओतप्रोत भरलेलें असतें. लग्नाच्या समारंभांत विहिणी आणि व्याही रुसून बसतात. त्या रुसव्यांत किती गंमत असते ! कांहीं कांहीं विहिणी मूर्ख असतात आणि त्या अगदीं बहकल्याप्रमाणें रागावतात, हें मला मंजूर आहे. त्यांनीं वेड्यासारखें रागावूं नये, असेंच मी ह्मणेन. पण याच्या उलट खेळकर स्वभावाच्या कांहीं विहिणी असतात, आणि त्या मुद्दाम गंमतीनें रुसून-फुगून बसतात. सोंगच असतें रागावण्याचें तें ! पण त्यांत केवढी उच्च प्रकारची विनोदबुद्धि असते ! आपण करतों हें बालिशपणाचें आहे, असें त्यांना समजत का नसतें ? पण त्या मुद्दामच कांहीं कांहीं न मिळणाऱ्या गोष्टी मागतात. थंडीच्या दिवसांत आंब्याचा आईसक्रीम आणि उन्हाळ्याच्या दिवसांत चण्याचा हुरडा मागणारी विहीण गंमतीची असल्यावांचून का ती असल्या

602




हवे तरी काय तुह्माला ? पृ. १६

गोष्टींची मागणी करील ? लग्नाच्या त्या आनंदी वातावरणांत असल्या रुसण्याफुगण्यानें एक प्रकारची मजेशीर भर पडते. विहिणीपेक्षां देखील जांवईबुवांचें रागावणें ह्मणजे काय अजब चीज आहे, याचा अनुभव जावें त्याच्या वंशा तेव्हांच कळे. कांहीं जांवई बेवकूफ असतात हें पाहिजे असल्यास प्रथम सांगतों. पण बाकींच्या जांवयांची मला येथें तरफदारी करावयाची आहे. आपल्या घरीं कांहीं मिळत नाहीं, किंवा आली आहे संधि तेव्हां लुटून घेऊं या सासऱ्याला, अशा भावनेनें थोडाच रुसणारा जांवई रुसून बसतो ? केव्हां रुसावयाचें, काय मागावयाचें, वगैरे अगोदरपासून ठरवून ठेवणाऱ्या जांवयाचा राग खरा का असतो ? ती एक तेवढ्यापुरती गंमत असते, तो दर्शनी राग असतो, खरा नसतो. एका कवयित्रींची कविता आठवते मला येथें. त्यांत एका जांवयाच्या रुसण्याची मजेशीर हकिकत दिली आहे. सारी पंगत जेवण्याकरितां सज्ज होऊन बसली असतांना कवितेंतलि जांवइबुवा रुसून बसले ! सासऱ्यांनीं बऱ्याच किंमती वस्तूंचीं नांवें घेऊन त्या हव्या असल्यास आणून देतों ह्मणून सांगितलें, पण जांवईबुवांचा रुसवा जाईना ! शेवटीं काकुळतीनें सासऱ्यांनीं विचारलें, हवें तरी काय तुह्मांला ? तेव्हां आपणाला तपकिरीची डबी हवी असल्याचें जांवईबुवांनीं सांगितलें !

याहीपेक्षां घरांत नवराबायकोंत हरघडीला जे रागा- वण्याचे समारंभ होतात, त्यांत तर केवढें काव्य असतें ! तीं रागावणीं आणि तीं रुसणींफुगणीं खरीं का असतात ? ते सारे प्रेमाचे खेळ असतात; आणि असल्या खेळांनींच संसारांतील जादू कायम टिकते, त्यांतील आनंद अवीट बनतो. ' खबरदार असं कराल तर ! जाईन मी माझ्या माहेरीं. ' असें ह्मणणारी पत्नी खरोखर का माहेरीं जायला उत्सुक असते ? सुतराम् नाहीं. सर्व खेळाडू वृत्तीच्या स्त्रियांना आपल्या प्रियकरांवर रागवावेसें वाटतें. इतकेंच नाहीं तर, आपण रागवावें आणि त्यांनीं येऊन आपला राग प्रेमाची भाषा बोलून घालवावा असेंहि वाटतें. ज्या हतभागी जीवांच्या संसारांतील असलीं रागावणीं– रुसणीं संपलीं असतील, त्यांच्या संसारांत आतां कांहीं राम उरला नाहीं असेंच मी ह्मणेन.

एकदां एक रामदासपंथी तरुण माझ्याकडे आला आणि ह्मणाला, " काय करूं मित्रा, रामदासस्वामींनीं ' सावधान ' ह्मणतांच जसें पलायन केलें तसें मी करा- यला हवें होतें. आमची ' ही ' उठल्याबसल्या रागवत असते; आणि मी कांहींहि विचारलें तर ' नाहीं ' ह्मणतें. मला तर असें झालें आहे कीं, कुठून हा अविचार केला आणि प्रपंच थाटला. त्यापेक्षां जन्मभर दासबोध पठन केला असता किंवा मनाचे श्लोक घोकून ह्मटले असते

तर देहाचें सार्थक तरी झालें असतें.' या माझ्या मित्राची मीं दोन शब्द सांगून समजूत घातली. त्याची बायको खरोखर प्रेमळ होती; पण या वेड्याला तिचें प्रेम समजत नव्हतें. तिच्या नकाराच्या मागें असलेल्या ध्वनिकाव्याची गोडी भगवीं वस्त्रें पांघरणाऱ्या त्या साध्याभोळ्या प्राण्याला काय कळणार ?

कित्येक भगवद्‌भक्तांचा रुसवाहि मोठा गोड असतो. तुकाराम किंवा नामदेव यांचे पंढरीच्या विठोबाला उद्देशून जे खोट्या रागाचे अभंग आहेत, ते ज्यांनीं वाचले असतील, त्यांना या संतांच्या ठिकाणीं देखील केवढा मजेशीर मानभावीपणा असे, त्याची खात्री पटेल.

खरें ह्मटलें तर रागावणें ही देखील एक कलाच आहे. ती सर्वांनाच साधते असें नाहीं. कांहींना ती इतकी साधलेली असते कीं, त्यांनीं जन्मभर आपणावर लोभ करण्याऐवजीं रागवावें असें आपणाला वाटतें. त्यांच्या रागांत एक प्रकारची मोहिनी असते, एक प्रकारची गोडी असते.

एकदां बॅ. रामराव जयकर यांचें पुणें येथील लॉ कॉलेजच्या विद्यार्थ्यांना उद्देशून व्याख्यान झालें. त्यावेळीं ते ह्मणाले " उत्तम वकील जो असतो त्याला न्यायाधिशावर केव्हां रागवावें, आणि केव्हां नमतें घ्यावें हें कळतें. " त्यांच्या ह्मणण्यांत मोठें तत्त्व गोवलेलें आहे

असें मला वाटतें. मोरोपंतांनी देखील याच अर्थाचा एक गीत्यर्ध लिहिला आहे.

॥ समयीं क्रोध असावा केवळ वशचित्त न
क्षमेला हो ॥

नेहमीं रागावणाऱ्यांप्रमाणेंच अजिबात न रागावणाऱ्यांची देखील लोकांना किंमत वाटत नाहीं. रागवावें पण मनांत राग धरूं नये. श्रीमंत सयाजीराव महाराज यांच्या स्वभावांतील एक विशेष त्यांच्या जवळच्या मनुष्यानें मला सांगितला तो येथें लागूं पडेल असा आहे. महाराज रागावतात, पण त्यांचें रागावणें वरकरणी असतें. त्यांच्या मनाला किंवा चित्ताला मुळींच त्रास होत नाहीं. त्यांचा राग दर्शनी असतो. माझे न्यायाधीश मित्र म्हणतात, ' रागावल्यानं होतंय काय ? मनाला मात्र त्रास होतो. ' त्याच्यावर माझें उलट म्हणणें असें कीं, मनाला जेथें त्रास होत नसेल अशा प्रकारचें रागावणें कांहीं वाईट नाहीं. कृतक कोप किंवा दर्शनी कोप कांहीं वावगा नाहीं. मनुष्यानें प्रसंगाच्या जरूरीप्रमाणें अवश्य रागवावें, पण त्या रागावण्यांत द्वेष नसावा, दुष्टबुद्धि नसावी. आपलें रागावणें निर्विष असावें, त्यांत न्यायबुद्धि असावी, पण खुनशीपणा नसावा.

# श्रीमन्तांचा स्वयंपाक

बुद्धिगडचे राजेसाहेब [ पूर्वीचे श्रीमंत ] गोपाळ-नंदन यांच्या कीर्तीचा सुवास थेट आमच्या घरापर्यंत येऊन पोंचल्यामुळें त्यांची प्रत्यक्ष मुलाखत घेण्याचें मीं ठरविलें. श्रीमंताची भेट घेणें म्हणजे कांहीं सोपें नव्हतें. किती तरी कड्या कुलुपें उघडून त्यांच्या राजद्वारा जवळ मला जातां आलें. श्रीमंताचा नातजावई आणि माझा एक जवळचा मित्र हे जानीदोस्त असल्यामुळें त्या नात-जावयानें मला परिचयपत्र लिहून दिलें. तें पत्र माझ्या खिशांत पडतांच माझी छाती अभिमानानें चार इंच फुगली, आणि माझा प्रवेश थेट राजेसाहेब बसले होते त्या खोलीच्या हॉलमध्यें झाला ! माझ्यांत आणि राजे-

सं. ६७१२



साहेबांत त्या वेळीं एका अभूतीचेंच काय तें अंतर होतें. श्रीमंतांचे कारभारी माझ्याशीं मुलाखतीविषयीं बोलत होते. एका भिंती आड श्रीमंत असतांना कारभाऱ्याशीं बोलण्याचा करंटेपणा मी पत्करणें शक्यच नव्हतें. मला ज्ञानोबांच्या ओंवीची आठवण झाली—' पासी त्वचेचिया पदरा आड । दुग्ध रसाळ गोड । परि तें अव्हेरुनिया गोचिड । अशुद्धचि सेवी ॥ ' अर्थात् दुधाचा आस्वाद सोडून चामडी चघळण्यांत मौजा मानणारा मी गोचिड नव्हतों. कारभाऱ्यांची चर्पटपंजरी थांबविण्याच्या हेतूनें मी म्हणालों, ' बघा बुवा तुमचं तुम्ही. नानासाहेबांचं ( नातजावयाचं ) हें पत्र आहे. तें श्रीमंतांना ताबडतोब दिलं नाहींत तर नानासाहेबांच्या रागाचा पारा किती उष्णतेपर्यंत चढेल हें मला कांहीं सांगवत नाहीं. गरीब असला तरी तो जांवई. आणि मी कोणीहि असलो तरी त्या जांवयाचा मित्र आहे, समजलांत मिस्टर. '

इतकें बोलणें ऐकल्यावर कारभारी आपलें धोतर सांवरीत माझें पत्र घेऊन आंत गेले, आणि पांचच मिनिटांत बाहेर येऊन हात जोडून मला म्हणाले, ' यावें आपण, असें आंत यावे. ' मी लगेच त्यांच्या मागें गेलों. एका लहान खोलींत आम्हीं प्रवेश केला. कौपीनधारी राजेसाहेब गोपालनंदन एका सुवर्णखचित देवाच्या सिंहासनासमोर दर्भासनावर बसले होते. आपल्या डाव्या

हाताच्या तळव्यावर मातीचा गोळा ठेवून त्याला उजव्या हातानें शंकराच्या लिंगाची आकृति देण्यांत ते मग्न झाले होते. त्यांच्या बाजूला चटईवर कांहीं मंडळी बसलीं होतीं. राजेसाहेब गोपालनंदन यांना मीं लवून नमस्कार केला. माझ्या नमस्काराचा स्वीकार मान हलवून करीत राजे-साहेब म्हणाले, 'काय देवा, बरे आहांत ? आमचे नानासाहेब मजेंत आहेत ? बसा असे खालीं.'

'होय महाराज, सर्व आनंदांत आहेत.' मी खाली चटईवर बसत म्हणालों.

'ऐकून बहुत आनंद झाला. इकडे येण्याचं प्रयोजन ?'

'महाराज, आपली कीर्ति ऐकून इकडे आलो. (श्रीमंतांनीं या वेळी आनंदप्रदर्शक मान हलविली.) आपला स्वयंकरणाचा सिद्धांत वाचून मनाला फार समाधान वाटलें. म्हटले, प्रत्यक्ष जाऊन एकदां पाहून तरी येऊं हा प्रयोग.'

'वाहवा ! वाहवा !! कांहीं चिंता नाहीं. घर आपलेंच आहे. आपलीं कामें आपण करणें, असा स्वयंकरण सिद्धांताचा अर्थ थोडक्यांत करतां येईल.' लिंगाकृति मातीवर अक्षता लावीत श्रीमंत म्हाणाले.

'म्हणजे महाराज ? समजलो नाहीं नीट अर्थ.'

बरोबर आहे तुमची शंका. दिसायला हा सिद्धांत फार सोपा दिसतो, आणि खरोखरीच तसा तो आहे; म्हणून तुमच्या प्रमाणेंच पुष्कळसे लोक बिचकतात तो ऐकून. स्वयंकरण-म्हणजे आपलीं यच्चयावत् कामें आपण करणें. हो, त्यांत काय कमीपणा आहे ? ' शंकराच्या पार्थिव लिंगावर श्रीमंतांनीं बेलाचें पान ठेवलें, आणि तोंडाचा डमरू वाजवून झाल्यावर ते म्हणाले, ' आमच्या राणी-साहेब हा सिद्धांत ऐकून प्रथम घाबरल्या. त्यांना काम करायची संवय नव्हती. कामाची माहिती नव्हती. अशा वेळीं भात कांडण्यापासून तो स्वयंपाक करण्यापर्यंतची सर्व कामें आम्हीं आमच्या राणीसाहेबांना शिकविली, बरं देवा. हो त्यांत काय कमीपणा आहे ? अंगावर सोन्या-मोत्याचे दागिने घालून भात सडीत असल्या वेळचा आमच्या राणीसाहेबांचा एक खास फोटो आम्हीं काढविला आहे. किंबहुना राणीसाहेब सर्व प्रकारचीं गृहकृत्यें करीत असल्यावेळची एक फिलमच तयार करविली आहे. हा चित्रपट येथील प्राथमिक शाळांतून दाखविला जातो. आमची अशी ठाम समजूत आहे कीं, ज्या क्षणीं प्रत्येक मनुष्याला आपापलीं कामें करण्यांत भूषण वाटेल, त्या क्षणीं स्वराज्य आपल्या हातांत येऊन पडेल. ' हातांतील पाथिव जमिनीवर ठेवीत राजेसाहेब म्हणाले.

' आपल्या प्रमाणेंच मला देखील वाटतें. आधुनिक सुशिक्षित तरुणांना आपलें सामान उचलायला कमीपणा

वाटतो. आगगाडीच्या डब्यांतून एकदां एका तरुणीला उतरतांना मी पाहिलें. तिच्याजवळ सामान कांहींच नव्हते. फक्त एक लहानशी फिड्लची बॅग. परंतु हीहि बॅग उचलण्यांत कमीपणा वाटून, तेवढ्याकरितां तिनें हमाल केला ! त्या वेळीं मला मोठें आश्चर्य वाटलें. '

' अहो आश्चर्य कसलें ? तिरस्कार वाटायला हवा.' एक गृहस्थ ह्मणाले .

' बरोबर बोललांत. मला तेंच सांगावयाचें होतें. इंग्लंडमध्यें प्रत्येकजण आपलें सामान उचलण्यांत धन्यता मानतो ! '

' यामुळें ते राहिले आहेत स्वतंत्र, आणि आह्मीं बनलों आहोंत गुलाम. '

' अगदीं बरोबर. '

' बरें तर आह्मी जरा नमस्कार घालून घेतों. आमचा नेम चुकवितां येत नाहीं. ' असें ह्मणून श्रीमंतांनीं साष्टांग नमस्कार घालण्यास सुरवात केली. श्रीमंतांचें पोट विशाल असल्यामुळें प्रत्येक नमस्काराच्या वेळीं त्यांचें नाक जमिनीला टेकलें तर पाय वर तरंगत आणि पाय वर टेकलें तर डोकें अधांतरीं लटकल्या सारखें दिसे. अशा वेळीं जवळ असलेल्या नोकराला उद्देशून ते ह्मणत, ' सदोबा, जरा पाय खालीं टेक रे. हं,

अश्शी–व्रत ह्मणजे तें व्रत. स्वयंकरणाचा हा सिद्धांतच आहे मुळीं.' मी आपला मुकाट्यानें आणि आदरयुक्त अन्तःकरणानें ही शारीरिक चळवळ बघत होतों. बारा सूर्यनमस्कार घालायला राजे साहेब गोपालनंदन यांना चोविस मिनिटें लागलीं. त्यानंतर ' आदित्यस्य नमस्कार ' वगैरे मंत्र ह्मणून त्यांनीं तीर्थ प्राशन केलें. त्याच सुमारास एका नोकरानें आमच्या समोर चहाचे पेले आणून ठेवले. ते घेण्याविषयीं श्रीमंतांनीं आह्मांला खूण केली. आह्मी चहा प्राशन करीत असतांना राजेसाहेबांनीं आपला श्रम परिहार करून घेतला. तेवढयांत कारभाऱ्यानें येऊन कांहीं कामाचे खलिते वाचून दाखविले. त्यांचीं काय उत्तरें द्यावयाचीं तीं श्रीमंतांनीं सांगितलीं. तीं सांगून झाल्यावर श्रीमंत गंभीर आवाजांत ह्मणाले, ' विचार करण्याजोगा प्रश्न आहे. केवढा आपला हा अफाट देश; आणि तो पाहावा तर परक्यांच्या हातांत! माशानें गिळलेलें माणिकच ह्मणानात. फार प्रयत्न करावे लागतील. फार फार प्रयत्न करावे लागतील हें माणिक, हा कोहिनूर परत मिळवायला. एक दोघांचे प्रयत्न नाहीं पुरणार. अनेकांचे संघटित प्रयत्न अनेक वर्षें चालले पाहिजेत. तर कांहीं झालें तर होईल. आह्मी स्वयंकरणाचा सिद्धांत फार वर्षें विचार करून प्रचारांत आणिला आहे. हिंदुस्थानांतील पसतीस कोटी लोकांनीं स्वयंकरणाच्या

सिद्धांताप्रमाणें वागण्याचें ठरविलें तर स्वराज्य वेगळें मागायला आणि मिळवायला नको आहे. माझा असा ठाम विश्वास आहे कीं स्वयंकरणानें आपण स्वयंपूर्ण Self-sufficient बनुं, आणि आपण स्वयंपूर्ण बनलों कीं फुलाला फळ लागावें त्याप्रमाणें आपल्या स्वयंपूर्णतेला स्वातंत्र्याचें फळ लागलेलें तुह्मांला आढळेल.'

'अगदीं बरोबर आहे महाराजांचें ह्मणणें.'

'तुह्मी आमच्याशीं सहमत अहांत हें ऐकून आनंद झाला. साधीं साधीं कामें का होईनात, आपलीं आपण केलीं पाहिजेत. तुह्मांला आश्चर्य वाटेल पण आमचें धोतर आह्मी धुऊन टाकतों. आमची पूजा आह्मी करतों. इतकेंच नाहीं तर आमचा स्वयंपाक आह्मीच करतों. हो, त्यांत काय कमीपणा आहे. स्वामी विवेकानंद उत्तम स्वयंपाक करीत. स्वयंपाक याचा अर्थच स्वतः करावयाचा पाक. तो करण्यांत प्रत्येकाला आनंद वाटला पाहिजे, भूषण वाटलें पाहिजे. निदान आह्माला तरी तसें वाटतें. रोज आह्मी आमचा स्वयंपाक करून जेवतों. तुह्माला कदाचित संशय येईल, ह्मणून आज भोजनाला आमच्याच येथें रहा. तें कांहीं चालायचें नाहीं. आज आमच्या हातचें जेवून जावयाचें, बरें का देवा.'

'महाराजांचा फार अनुग्रह आहे या दासावर.'

‘ ठीक आहे तर. थोडा वेळ ताजी वर्तमानपत्रें वाचीत बसा. कांहीं वेळानें आह्मी वेषांतर करून मुदपाकखान्यांत जाऊं तेथें जेण्याविषयीं तुम्हांला पाचारण करण्यांत येईल. [illegible] प्रत्यक्ष पहाल आम्हांला स्वयंपाक करतांना. [illegible]

‘ जशी आपली इच्छा. ’ असें म्हणून आश्चर्यचकित होत मी बाहेर येऊन एका खुर्चीवर बसलों. मला बसलेला पाहतांच कारभारी माझ्याजवळ अदबीनें येऊन म्हणाले, ‘ वाहवा रावसाहेब, आपले बरेच वजन दिसतें महाराजांजवळ. त्यांच्या स्वयंपाकाचे भागीदार आजपर्यंत हाताच्या बोटावर मोजण्याइतकेंच लोक झाले असतील. भाग्य आपलें म्हणावयाचें.’

कारभारीसाहेबांचें बोलणें ऐकून माझ्या अंगावर मूठभर मांस आल्यासारखें मला वाटलें; आणि त्याच्या भरांत मी ह्मणालों, ‘ अहो जावयाचा मित्र ह्मणजे तुह्मी काय समजतां ? शिवाय मला स्वयंपाक खाऊं घातल्यानें तुमच्या राजेसाहेबांची कीर्ति उत्तर हिंदुस्थानांत पसरेल ती वेगळीच. ’

‘ ह्यः ह्यः ह्यः ! तेंहि खरेंच. ’ असें ह्मणत कारभारीसाहेब त्यांच्या कामाला निघून गेले. ते गेल्यावर मी ताजी वर्तमानपत्रें चाळूं लागलों. त्यांत जिकडे

तिकडे राजेसाहेबांच्या स्वयंकरणाच्या सिद्धांतावर अग्रलेख, स्फुट सूचना, स्वतंत्र लेख, असा मजकूर आढळला. प्रत्येकानें बाह्यतः राजेसाहेबांची स्तुती केलेली असली तरी गर्भितपणें निंदाच केली होती. परंतु वर्तमानपत्रकार ह्मणजे हृदयशून्य राक्षसच होत, असें मला एका कवी-प्रमाणेंच वाटत असल्यामुळें मी त्यांच्या बडबडीकडे लक्ष दिलें नाहीं. उलट राजेसाहेबांच्या चळवळींत खरो-खरीच कांहीं तरी आहे, आणि हे निंदक अकारण त्यांची निंदा करीत आहेत असें मला मनापासून वाटूं लागलें. मी मनांतल्या मनांत वर्तमानपत्रकारांना शिव्या देऊं लागलों. इतक्यांत मला राजेसाहेबांचें बोलावणें आलें.

शिपायाच्या मागोमाग मी मुदपाकखान्यांत गेलों. तेथें चार पांच मातीच्या शेगड्या मांडल्या असून त्यांत विस्तव पेटलेला दिसत होता. त्यांपैकीं प्रत्येकीवर भांडीं ठेवलेलीं असून त्यांत खाण्याचे पदार्थ शिजत असलेले दिसत होते. खुद्द श्रीमंत धोतर नेसलेले व खांद्यावर पंचा टाकलेले असे एका लांबट चवरंगावर बसले होते. जवळच तीन चार नोकर श्रीमंतांना मदत करायला ह्मणून उभे होते. श्रीमंतांना पाहतांच मीं पुनः लवून नमस्कार केला. माझ्या नमस्काराचा स्वीकार करीत श्रीमंत ह्मणाले, ‘ काय ह्मणतात तुमचीं वर्तमानपत्रें ? ’

'जाऊं द्या महाराज. आपण कशाला तिकडे लक्ष द्या. कोणत्याहि चांगल्या गोष्टीकडे लोक प्रथम साशंकतेनेंच बघतात.'

'बरोबर बोललात. हें आमच्या ध्यानांत असल्यानें आह्मी लोकमताची पर्वा करीत नाहीं. जी गोष्ट आमच्या मनाला पटली असेल तिचा प्रसार केल्यावांचून आह्मी कधींच राहत नाहीं.'

इतक्यांत एका नोकरानें सांगितलें, 'महाराज पाण्याला उकळी फुटली. तांदुळ वैरायचे ना ?' त्याचें बोलणें ऐकून श्रीमंतांनीं त्याच्या हातांतली रोळी घेतली व पाण्यांत तांदूळ टाकले. नंतर ते माझ्याकडे वळून म्हणाले, 'ह्या स्वयंपाकाचें महत्त्व फार मोठें आहे बरें. **अन्नं ब्रह्मेति व्यजानात्** ह्मणून आपल्या उपनिषद्कारांनीं ज्याचीं स्तुति केली आहे, तें अन्न आपलें आपण शिजविलें पाहिजे. ब्रह्मोपासना ही ज्याची त्यानेंच केली पाहिजे. स्वावलंबनाचा पाया स्वयंपाकांत आहे. शुद्ध, सात्विक, पवित्र अन्न तुह्मांला स्वयंपाकांतच मिळेल. परपाकांत मिळावयाचें नाहीं.'

पुनः दुसऱ्या एका नोकरानें सांगितलें, 'महाराज, ही भाजी शिजत आली. तिच्यांत तिखट, मीठ, गूळ वगैरे टाकायला हवें आहे. हें घ्यावं.' असें ह्मणून नोकरानें श्रीमंतांच्या हातांत तिखट, मीठ, गूळ, हळद वगैरे

जिनसांचे चमचे दिले; आणि मग श्रीमंतांनीं ते ते पदार्थ भाजींत टाकले. नंतर ते माझ्याकडे वळून ह्मणाले, ' तुमच्या राजकारणांत आजकाल स्वयंनिर्णयाचें नवीन तत्त्व निघालें आहे. त्या तत्त्वानुसार हिंदुस्थानची राज्य-घटना तयार करण्याचा अधिकार हिंदी लोकांकडे येतो. हें तुमचें स्वयंनिर्णयाचें तत्त्व आमच्या स्वयंकरण सिद्धांताजवळचेंच आहे. उलट आह्मीं एक पाऊल तुमच्या पुढें आहोंत. आह्मीं ह्मणतों—नुसता निर्णय करूं नका, कृति करा, स्वतः कृति करा. '

इतक्यांत दुसऱ्या एका नोकरानें येऊन सांगितलें, ' महाराज, ही काकडीची कोशिंबीर. यांत मोहरी आणि साखर टाकायला हवी. आणि हें मीठ.' श्रीमंतांनीं त्याच्या सांगण्याप्रमाणें कोशिंबिरींत मीठ, साखर व मोहरीची पूड टाकली. नोकर तयार झालेली कोशिंबीर घेऊन गेला. तो गेल्यावर राजेसाहेब मला उद्देशून पुनः ह्मणाले, ' आत्म्याचा विकास स्वातंत्र्याच्या वातावरणांतच होतो, आणि हें स्वातंत्र्य हरप्रयत्नानें हरघडी राखण्याचा प्रयत्न आपण केला पाहिजे. आपलीं कामें आपण केल्यानें आपली मनोवृत्ती स्वतंत्र बनते. स्वयंकरणाच्या तत्त्वानें आत्मविकास जसा होतो तसा कशानेंहि होत नाहीं.'

तिसऱ्या एका नोकरानें तेवढ्यांत येऊन सांगितलें, ' महाराज, कढीला आणि भाजीला फोडणी द्यायला

हवी आहे. पळी तापली आहे. तींत ह्या मोहऱ्या टाका-ल्यात.' श्रीमंतांनीं त्याच्या सांगण्याप्रमाणें तापलेल्या तेलांत मोहऱ्या टाकल्या आणि त्या तड्तड् वाजावयाच्या थांब-ल्यावर कढीला व भाजीला त्यांनीं फोडणी दिल्यावर मला ते ह्मणाले, ' काय बरं सांगत होतो ? हं; आत्मविकासा-विषयीं. पूर्वीचे ऋषी आपापल्या आश्रमांत स्वयंपाक करीत असत ते या आत्मविकासाकरितांच. पूर्वीच्या राजांनादेखील उत्तम स्वयंपाक करतां येत असे. ही स्वयंपाकाची परंपरा आपण अखंड राखली पाहिजे बरं. '

' बरोबर आहे महाराज, मला देखील स्वयंपाक करतां येतो. '

' ठीक, ठीक. आनंद वाटला आम्हांला हें ऐकून. आम्हांला वाटलंच तुम्ही आमच्या पंथाचे असाल म्हणून. हा आपला स्वयंकरणाचा पंथ वा संघ आपण वाढविला पाहिजे. कल्पवृक्ष आहे वरं तो. काय मागाल तें मिळेल त्याच्या जवळ. '

' अगदीं बरोबर. या कामीं महाराजांना शक्य ती मदत करायला मी तयार आहें. '

' या संघाची वर्गणी वगैरे कांहीं नाहीं. प्रत्येकानें आपलीं सर्व कामें आपणच करण्याची प्रतिज्ञा मात्र घेतली पाहिजे. आपण शक्य तितकें स्वयंपूर्ण झालें पाहिजे. '

' म्हणजे आपणाला लागणाऱ्या कापडाचें सूतहि आपणच काढलें पाहिजे ? '

' हीच तर मौज आहे या स्वयंकरण सिद्धांताची. आजपर्यंतच्या सर्व राजकीय पुढाऱ्यांच्या तत्त्वांचा अर्क यांत तुम्हांला आढळेल. नेमस्तांचा सहकार, टिळकांचा प्रतिसहकार, गांधींचा असहकार, सर्व कांहीं यांतआहे. '

श्रीमंत असें बोलत असतांना एक मदतनीसानें जवळ येऊन सांगितलें, ' महाराज, भात शिजून तयार झाला. आपण म्हणत असलांत तर पातेलें खालीं उतरवितों. माझ्या पोळ्या करून तयार आहेत. ' त्यावर महाराज म्हणाले, ' बरं तर. पातेलें खाली उतरीव. पोळ्यांना तूप लावून झाल्यावर राणीसाहेबांना त्यांचा स्वयंपाक घेऊन यायला सांग. झाली एकदाची पाकसिद्धी. स्वयंपाक झाला कीं किती मनाला बरें वाटतें. कृतार्थ झाल्यासारखें वाटतें. ब्रह्मोपासनाच ती ! जारे पानें मांडा.'

श्रीमंतांनीं आपल्या नोकरांना अशा प्रकारची आज्ञा सोडल्यावर ते बसल्या जागचे उठले व बाहेर चौकांत येरझारा घालूं लागले. मीहि त्यांच्या बरोबर एका हाताच्या अंतरावर अदबीनें फिरूं लागलो. कांहीं तरी बोललें पाहिजे म्हणून मी म्हणालों, ' आपली ही स्वयंकरणाची पद्धति प्रत्येक श्रीमंतानें अवलंबिली पाहिजे

असें मला वाटतें. आपणाला स्वयंपाक करीत असतांना पाहून मला एक पुरातन व एक अद्यतन अशीं दोन उदाहरणें सुचलीं.'

'असं ह्मणतां? वाहवा! कोणतीं तीं उदाहरणें?'

'पहिलें उदाहरण द्वितीय पांडव भीमाचें व दुसरें पंडित मदनमोहन मालवीय यांचें. भीम हा सूपशास्त्रांत पारंगत होता. पंडित मालवीय हेहि–एखादा मालवीय न भेटल्यास–आपला स्वयंपाक आपण करतात. आगगाडीच्या डब्यांतही पंडितजी भात शिजवून खातात.'

'धन्य ती त्यांची तत्त्वनिष्ठा! उगाच नाहीं त्यांनीं हिंदु युनिव्हर्सिटी स्थापन केली.' श्रीमंत ह्मणाले.

आह्मी असें बोलतों आहोंत इतक्यांत समोरून कांहीं बाया येतांना दिसल्या. त्यांच्याकडे पाहून राजेसाहेब उद्गारले, 'आल्याच राणीसाहेब.' वज्रचुडेमंडित, अनेकाअलंकारविभूषित, इरकली लुगडें व धारवाडी खण इत्यादींनीं परिवेष्टित अशा राणीसाहेबांना येतांना पाहून मी लवून नमस्कार केला. त्यांनींहि उलट मला नमस्कार केला. राणीसाहेबांच्या मागोमाग दोनतीन दासी स्वयंपाकाचीं भांडीं घेऊन आल्या. पुढें राणीसाहेबांच्या दासींनीं व राजेसाहेबांच्या दासांनीं मिळून पानें मांडलीं, आणि

आह्मांला बाहेर येऊन वर्दी दिली. उभयतां श्रीमंतांच्या मागोमाग मी भोजनाच्या जागीं गेलों. थोड्याच वेळांत आह्मी भोजनाला सुरवात केली. श्रीमंत आपण केलेल्या पदार्थांची वाखाणणी करकरून खात होते. सौभाग्यवती राणीसाहेबहि त्यांच्या पदार्थांची स्तुति करून त्यांचा आस्वाद घेत होत्या. मीहि वरकरणी उभयतां श्रीमंतांचें त्यांनीं केलेल्या स्वयंपाकाबद्दल अभिनंदन करीत होतों. परंतु श्रीमंतांचा स्वयंपाक खरोखरीच कसा झाला होता हें मीं आपणाला सांगावयाला पाहिजे असें थोडेंच आहे ?

# खाणाखुणा

मी जेव्हां जेव्हां उन्हाळ्याची सुटी संपवून परत येतों तेव्हां तेव्हां बडोद्यास सर्व 'आलबेल' किंवा ठाकठीक आहे किंवा नाहीं हें अजमाविण्याच्या माझ्या कांहीं खाणाखुणा ठरलेल्या आहेत. त्यांपैकीं एक अशी—

संध्याकाळीं किंवा सकाळीं मी फिरावयास म्हणून बाहेर पडलों, आणि खूप दूर चालून गेल्यावर तेथें एक वयस्कर मुसलमान गृहस्थ फिरत असतांना दिसले, ह्मणजे मला समाधान वाटतें. पायांत तुमान, अंगावर गुडघ्यापर्यन्त पोंचणारा पांढरा सदरा, हातांत पार्शी लोक घालतात तसली काळी टोपी आणि खांद्या-



[ चित्रकार—गोलिवडेकर ]

तेथें एक वयस्कर मुसलमान गृहस्थ फिरत असतांना दिसले म्हणजे मला समाधान वाटतें.

सं. ग्रं. ८०२



वर घाम टिपण्याकरितां टॉवेलवजा रुमाल—अशा वेष-भूषेनें सजलेली त्यांची कृश शरीरयष्टी जमिनीकडे दृष्टि लावून चालत असतांना दिसली ह्मणजे माझी खात्री पटते कीं, आपण बडोद्यांतच असून बडोद्यांतील वाता-वरण किंवा वर्तमान व्यवस्थित आहे ! उन्हाळा असो किंवा कडाक्याचे थंडीचे दिवस असोत, पायाला भोंवरा असल्याप्रमाणें सकाळ—संध्याकाळ विचारमग्न स्थितींत फिरणाऱ्या या मूर्तीकडे पाहिलें कीं, सूर्याचीं नियमित आक्रमणें फिक्कीं वाटूं लागतात. अल्ला करो आणि माझ्या या अपरिचित मुसलमान मित्राला दीर्घायु प्राप्त होवो ! माझी अशी ( वाटल्यास भोळसर ह्मणा ) समजूत आहे कीं, जों पर्यन्त ही स्वारी बडोद्यांत फिरते आहे तोंपर्यंत बडोद्याकडे वक्रदृष्टीनें पाहण्याची कळिकाळाची देखील प्राज्ञा नाहीं !

मागें एकदां लक्ष्मीविलास राजवाड्याजवळ एका-एकीं भूगर्भांतून कारंज्या प्रमाणें खूपच उंच पाणी उडूं लागलें होतें. त्या पाण्याचा जोर आणि त्यांत असलेलीं गंधकादि द्रव्यें पाहून तज्ज्ञ शास्त्री मंडळींनीं सांगितलें कीं, पुढें मागें लवकरच बडोद्यांत भूकंप होण्याचीं चिन्हें दिसत आहेत. त्यावेळीं वटोदरस्थ आह्मीं लोक बरेच घाबरून गेलों होतों. परंतु माझ्या मुसलमान स्नेह्याचीं परिभ्रमणें पूर्वीप्रमाणेंच चालू असलेलीं पाहतांच मला

वाटलें कीं, हा भूकंप लवकरच शांत होईल. आणि तसेंच झालें शेवटीं ! तेव्हांपासून मी या महंमदानुयायाकडे आदराच्या व श्रद्धेच्या दृष्टीनें पाहात असतों.

कोलंबसाला जसा पुष्कळ दिवसांच्या जलप्रवासानंतर प्रथमच जेव्हां दूरवर जमिनीचा भाग दिसूं लागतांच आनंद झाला, तसाच आनंद पुष्कळांना आयुष्याचा प्रवास करीत असतांना वाटेंत परिचयाच्या खाणाखुणा दिसल्या कीं होतो. त्यांना साहजिकच वाटतें, येथवर तरी सर्व ठीक आहे. आपला मार्ग चुकलेला नाहीं. वाट चुकलेल्या पांथस्थाला एकाएकीं आपल्यापुढें पदचिन्हें दिसतांच जसें समाधानाचें सुख लाभतें तद्वतच यांचें. किंवा ऐन माध्यान्हकाळीं तहानेनें व्याकुळ झालेल्याला आणि पाण्याचा शोध करकरून दमलेल्याला कुठून तरी दुरून पाणी जवळच असल्याचें चिन्ह ह्मणून पाणकोंबड्या किंवा कलहंस यांचे आवाज ऐकूं आले ह्मणजे जसें बरें वाटतें तसेंच आपणांपैकीं बहुतेकांचें असतें. मनुष्य स्वभावांतच, वाटल्यास ह्मणा, असें कांहींतरी आहे कीं, त्यानें परिचिताला पाहून निश्चिंत व्हावें आणि अपरिचिताला पाहून सचिंत व्हावें. डोळे किलकिले करून खात्री करावी, कीं हें फायदेशीर होणार आहे ना ?

एक वृद्ध बाई माझ्या नातेवाईक आहेत. प्रवासाला जातांना आणि प्रवासाहून परत आल्यावर मीं त्यांना लवून नमस्कार केला, स्नान झाल्यावर उभें किंवा आडवें गंध लाविलें, जेवतांना सोंवळें नेसलों, एकाद्या पुण्य-तिथीच्या दिवशीं ब्राह्मणाला भोजन घालून दक्षिणा दिली, ह्मणजे त्यांची खात्री होते कीं, मी शंभर टक्के धार्मिक, आस्तिक किंवा सनातनी आहे. त्याचप्रमाणें एखाद्या स्त्रीनें कलदार रुपायाएवढें कपाळावर कुंकू लाविलें, गळ-फांस बसेल इतक्या बेतानें गळ्याभोंवतीं काळी पोत बांधली, कोंपरापर्यंत बाह्या असलेली धारवाडी खणाची चोळी घातली, किंवा चातुर्मास्यांत बोटवाती अगर काड-वाती लावल्या ह्मणजे तिच्या पातिव्रत्याविषयीं अगर आस्ति-क्याविषयीं त्यांना बिलकूल शंका उरत नाहीं. भारतीय वा पौराणिक संस्कृतीच्या या खाणाखुणा पाहिल्या कीं त्यांच्या डोळ्यांत आनंदाश्रु उभे राहातात आणि त्या ह्मणतात, ' असो अजून अगदींच कांहीं धर्म बुडालेला नाहीं. बाकी आतां व्यासांनीं सांगितल्याप्रमाणें कली माजलाच आहे. '

वर उल्लेखिलेल्या मुसलमान गृहस्थाला पाहिलें ह्मणजे माझ्या मनाची जी स्थिति होते, तीच स्थिति जुन्या संस्कृतीच्या दर्शक अशा खाणाखुणा दिसल्या कीं, या वृद्ध बाईची होते. पण मी जेव्हां जेव्हां स्वस्थपणें



...लवून नमस्कार केला, म्हणजे त्यांची खात्री होते कीं, मी शंभर टक्के धार्मिक आणि सनातनी आहे. [ चित्रकार—गोलिवडेकर ]

विचार करूं लागतों, तेव्हां तेव्हां आमच्या विचार-सरणींतील भोळेपणा किंवा तर्कच्युति माझ्या लक्षांत येते; आणि मग माझी मलाच कींव करावीशी वाटते.

शास्त्रवेत्त्यांच्या सांगण्याप्रमाणें आणि आपल्या सामान्य जनांच्या अनुभवांप्रमाणें सृष्टीचें सारें स्वरूप प्रत्यहीं थोडेंफार पालटतेंच आहे. जिथें आज हिमालय दिसतो तिथें पूर्वी सागर होता असें भूगर्भशास्त्रवेत्ते सांगतात. तसेंच, जिथें आज अरबी समुद्र आहे तिथें जमीन असून ती आफ्रिका व हिंदुस्थानांतील मध्यप्रांत यांना जोडीत असे आणि तिचें नांव गोंडवन हेंच होतें असें सांगतात. सृष्टीच्या या बाह्य खाणाखुणांत जसा कालांतरानें बदल पडतों, तसेंच आपल्या समाजसृष्टीचें आहे. जग हें गतिमान् असून त्याची प्रगति याच गोष्टींवर अवलंबून आहे. त्यान् त्याच गोष्टी आणि वस्तु नेहमीं पाहावयाच्या झटल्या आणि त्याकरितां हट्ट धरला तर जग आहे त्याच स्थितींत राहील. सुधारणांचें चक्र वायु-वेगानें जगभर फिरत असतांना, आपण आपल्या संस्कृती-लाच केवळ चिकटून रहाण्याचें ठरविलें तर तें हास्यास्पद व हानिकारक तर आहेच; परंतु त्याहीपेक्षां अशक्य आहे.

ॲबिसीनियन लोकांनीं आपल्या जीर्ण संस्कृतीला कवटाळून राहाण्याचा प्रयत्न केला, त्यांतच त्यांच्या विनाशाचें मूळ कसें होतें हें सर्व जगानें नुकतेंच पाहिलें

आहे. जग बदलतें आहे, चालतें आहे, त्याबरोबर आपणहि बदललें पाहिजे, चाललें पाहिजे. नेहमींच आपले जुने रथ आणि छकडे, जुनीं पागोटीं आणि उपरणीं, जुने पीतांबर आणि पैठण्या कशाला दिसायला हव्यात ? समाजशरिराचीं हीं वस्त्रें होत, आणि तीं कालमानाप्रमाणें बदलावयाचींच. मूळ आत्म्याचें स्वरूप उन्नत आणि उदात्त राहिलें ह्मणजे झालें. भारतीय संस्कृतीचीं आत्म्याच्या मापानें मोजतां येतील अशीं कांहीं वैशिष्ट्यें असतील तर तीं आपोआपच टिकतील. बाकीच्या खाणाखुणा राहिल्या काय किंवा गेल्या काय ! किंबहुना त्या बुद्ध्या खणून काढतां आल्या नाहींत तरी नष्ट झालेल्याच चांगल्या. सुविचारांचें आणि सद्धेतूंचें दिग्दर्शक किंवा होकायंत्र ज्यांच्याजवळ आहे त्यांना खाणाखुणा खणून निघाल्याबद्दल काळजी कधींच वाटत नाहीं.

समजा, एखादा मनुष्य प्रवासाला निघाला आहे; आणि बरोबर शिधासामुग्रीचीं गांठोडीं त्यानें घेतलीं आहेत. वाटेंत जसजशा जिनसा खपतील, तसतशीं त्याचीं गांठोडींहि लहानलहान होत जातील. इतकीं कीं, गांठोडीं जाऊन त्याच्याजवळ तिखटामिठाचा वास येणारीं फक्त फडकींच शिल्लक राहातील. अशा वेळीं त्यानें तीं फडकीं फेंकून दिलीं काय, आणि संग्रहून ठेवलीं काय, दोन्हीं सारखेंच ! आपल्या चालीरीतींचें असेंच आहे.

एके काळीं त्या उपयुक्त होत्या, समाजाची धारणा करीत होत्या, पण आज मात्र आपल्याजवळ दुर्गंध येणारीं रिकामीं फडकींच शिल्लक राहिलीं आहेत. आज त्या चालीरीती गैरलागू आहेत, ते धर्मनिर्बंध निरुपयोगी अतएव भारभूत आहेत.

रिप वॅन विंकल हा आपल्या दीर्घ झोंपेंतून जेव्हां जागा झाला तेव्हां त्याला परिचयाच्या खाणाखुणा न दिसल्यानें तो भांबावून गेला. आपल्या सर्वांचें असेंच होतें. आपण भांबावून जातों. माझें काय होतें, हें मीं प्रथमच सांगितलें. पण यांत आपल्या हातून चूक घडते आहे, असें मला आतां वाटूं लागलें आहे. कारण ते वृद्ध गृहस्थ मला आणखी किती दिवस दिसतील ? आणि मला दिसले ह्मणून इतरांनाहि दिसतील हें कशावरून ? जगांतील खाणाखुणा अशाच बदलत जावयाच्या. त्यांतच जगाच्या प्रगतीचें बीज आहे. कविवर्य टेनिसननेंहि ह्मटलें आहे—

Old order changeth,
yielding place to new
And God fulfills himself
in many ways.

# दिलदारपणा

" दिल्दारपणा हा रक्तांत असावा लागतो. त्याचें अवसान आणलें तरी तें टिकत नाही. उलट मनाचें दारिद्र्यच त्यानें उघडकीस येतें, " नागपूरचे डी. लक्ष्मीनारायण यांनीं तेथील विद्यापीठाला पस्तीस लाखांची उदार देणगी दिली, तिची हकीकत वाचून झाल्यावर मल्लिनाथी करीत एक प्रवासी उद्गारला. दुसऱ्या प्रवाश्यानें त्यावर " नाही तर काय, ज्यानें दिलें आहे तोच देउं जाणे " असें म्हणून त्याला आपली पुस्ती जोडली. आगगाडीच्या डब्यांत झालेला संवाद. एका कानानें ऐकून दुसऱ्या कानानें सोडून देण्याच्या योग्यतेचा. परंतु काय असेल तें असो, त्या प्रवासाला इतके दिवस उलटू-

नहि, 'दिलदारपणा हा रक्तांत असावा लागतो,' हे शब्द मात्र अजूनहि माझ्या बरोबर प्रवास करीत आहेत. आणि जों जों मी त्यांच्यावर जास्त विचार करतों तों तों मुरलेल्या मुरंब्याप्रमाणें ते मला अधिकच गोड वाटूं लागले आहेत.

श्रीसमर्थ रामदासस्वामींनीं शिवाजीमहाराजांजवळ गुरुदक्षिणा मागितली असतांना, त्यांनीं आपलें सारें राज्य त्यांच्या झोळींत घातलें! आपल्याजवळ बाकी किती जमीन उरली याचा विचार त्यांनीं कधीं केला नाही. उलट रामदासस्वामींनीं देखील गुरुप्रसाद म्हणून त्यांना तेच राज्य परत अर्पण केलें. दिलदारवृत्तीचें यापेक्षां सुंदर उदाहरण कुठें पाहावयास सांपडणार ? त्यांतल्या त्यांत मिळालेलें राज्य परत करणें, हें आधुनिक कितीशा संतशिरोमणींना साधेल ? दिलदारपणा हा रक्तांत असावा लागतो हेंच खरें.

दुथडी भरून वाहणाऱ्या नदीप्रमाणें दिलदार मनुष्याचें अन्तःकरण औदार्याच्या भावनेनें ओसंडूं लागतें. माझे आतां बांध फुटून जातील, असा नदीनें कधीं विचार केला आहे का ? माझें काय होईल, याचा विचार दिलदार वृत्ति ज्याच्या ठिकाणीं आहे असा मनुष्य कधींच करणार नाही. श्रीकृष्णानें आपली करंगळी कापल्याचें सोंग करून चिंधी मागावयाला पाठविलें असतांना द्रौप-

दीनें विचार केला नाहीं कीं आपल्या जरीकांठी पैठणीचें काय होईल ? तिनें ताबडतोब तिचा मौल्यवान पदर फाडून श्रीकृष्णाकडे पाठविला. मागचा पुढचा विचार केला तर तो दिलदारपणा कसला ? जे मनानें दरिद्री आहेत त्यांनीं असले विचार करावेत. हृदयाची श्रीमंती ज्याच्याजवळ आहे, त्याचें हृदय उचंबळून यावयाचेंच.

दिलदार वृत्ति ही पैशावर अवलंबून आहे असें मुळींच नाहीं. उलट गरिबाच्या झोंपडींत तिचें दर्शन जसें आपणाला घडेल, तसें कांहीं एखाद्या महाराजाच्या महालांत घडावयाचें नाहीं. श्रीमंत एखादे वेळीं दिलदार दिसले तर त्यांत कांहीं दगा आहे असें खुशाल समजावें. उलट गरिबांच्या दिलदार वृत्तींत कसला आला आहे दगा ? दुसऱ्यांच्या आनंदांत आनंद मानणारे ते. त्यांचा दिलदारपणा म्हणजे आत्म्याचा सौंदर्याविष्कार ! माझ्या एका स्नेह्याकडे मी एकदा बसलों असतांना, त्याच्या घरमालकाकडून त्याला भेट म्हणून कलमी चिकूंचा करंडा आला ! त्या वेळीं माझ्या प्रश्नार्थक मुद्रेकडे पाहात तो म्हणाला, “ आमच्या चिक्कू मालकानें चिकू पाठविलेले पाहून तुला आश्चर्य वाटतें आहे नाहीं ? मुलीच्या लग्नांत आम्ही सहकुटुंब सहपरिवार उपयोगी पडावें म्हणून ही तरतूद आहे. ” स्वार्थी श्रीमंताच्या दिलदार वृत्तीचा हा नमुना पाहून मी चकितच झालों.

## दिलदारपणा

दिलदारपणाच्या बाबतींत कांहीं कांहीं जाति किंवा वर्ग विशेष प्रसिद्ध आहेत. मुसलमान लोक हे जात्या दिलदार असतात. नबाबांच्या दिलदार वृत्तीच्या आख्यायिका सर्वश्रुत आहेत. एका नबाबानें आपल्या खासगी कारभाऱ्यावर निहायत खूष होउन व आपल्या तिजोरीच्या किल्ल्या त्याच्या स्वाधीन करून, काय वाटेल तें न्यावयाला त्याला फर्मांविलें. पुढें त्या कारभाऱ्यानें दोन लाखांचा ऐवज नेल्याचें कोणी नबाबाला सांगितलें. त्यावर तो म्हणाला, " खैर. कुछ फिक्र नही. दिल तो खूष हुआ. " आपल्या समाजांत मराठे, कायस्थ व देशस्थ हे इतर कोणत्याहि जातींपेक्षा विशेष दिलदार असतात. अन्तःकरणाचें औदार्य या जातींत जसें उत्कटत्वानें आढळतें तसें इतरत्र क्वचितच आढळतें. वर जी शिवाजीमहाराजांची आख्यायिका दिली आहे, तींतहि अप्रत्यक्षपणें मराठे व देशस्थ यांचाच दिलदारपणा व्यक्त झालेला आहे. अर्थात् प्रस्तुत लेखकासारख्या कांहीं सज्जन कोंकणस्थांचा यांतच अंतर्भाव करावयाला पाहिजे हें उघड आहे.

पुराणांत राजे लोकांचीं जीं वर्णनें आलीं आहेत तीं वाचलीं असतांना दिलदार वृत्तीची कल्पना फार चांगल्या रीतीनें येते. हे राजे आनंदाच्या भरांत आले कीं आपला खजिनाच मुळीं लुटवीत असत. वाटेल त्यानें

नेववेळ तितकें खजिन्यांतून किंवा भांडारांतून न्यावें अशी राजाज्ञा अशा वेळीं सुटे. मानवी समाजाच्या उषःकालीं अंदाजपत्रकें करून राज्यकारभार चालत नसे. आपल्या बाहुबलावर सारी पृथ्वी आक्रमण करूं असा आत्मविश्वास वाटणाऱ्या वीरांचीं अंतःकरणें दिलदार वृत्तीनें ओतप्रोत भरलेलीं असावयाचींच. आणि शेक्सपिअरनें सांगितलेल्या दयेप्रमाणेंच, दिलदार वृत्ती देखील, जो ती दाखवितो तसेंच ज्याला ती दाखविली जाते अशा दोघांनाहि उपकारक ठरते.

निसर्गाकडे पाहिलें असतांना या वृत्तीचें प्रत्यंतर सर्वत्र पाहावयास सापडतें. वसंत ऋतूंत फळांना आणि फुलांना येणारा बहर पाहिला किंवा वृक्षांवर दिसणाऱ्या मोहरेदार पालवीकडे पाहिलें कीं, या दिलदार वृत्तीलाच भुलून तर कोकिळादि पक्षिगण गाणीं गात नाहींना असें वाटूं लागतें. तोच प्रकार वर्षाऋतूचा. केवढ्या औदार्यानें मेघ पृथ्वीवर सरींवर सरी सोडीत असतात! आणि पृथ्वी तरी कांहीं कमी का उदार आहे! एकपट जर तिच्यांत पेरलें तर त्याच्या शंभरपट तुम्हांला ती परत करणार; शिवाय जेथें साधेल तेथें हिरवळीचे गालिचे पसरून आणि डोंगरांत रुपेरी पाण्याच्या माळा सोडून रसिकांना रंजविणार ती वेगळीच. सूर्यचंद्रांचें औदार्य तर म्हणींत समाविष्ट झालें आहे. हें घर सज्जनाचें कीं

दुर्जनाचें, भूमि चांगली कीं वाईट, याचा विचार सूर्यकिरणांनीं किंवा चंद्रकिरणांनी केला आहे का? आपल्या तेजस्वी किरणांनीं सर्वत्र चैतन्य उत्पन्न करावयाचें हें सूर्याला माहीत, आणि आपल्या शीतल रश्मींनीं चोंहीकडे आनंदाचें साम्राज्य निर्माण करावयाचें हें चंद्राला माहीत. सूर्यचंद्र कशाला विचारतात कीं आपलीं किरणें सहाराच्या वाळवंटावर पडलीं आहेत कीं हरिद्वार येथील गंगेच्या पाण्याशीं खेळत आहेत. दिलदारपणा रक्तांत असावा लागतो हेंच खरें.

# घराबाहेर

त्या दिवशीं सकाळीं उठल्याबरोबर मला 'घराबाहेर' नाटकाचा प्रयोग करावा लागला. स्नान करून मी बाहेर येऊन पाहातों तों दहाबारा संन्याशांचा जमाव आमच्याच घराच्या दिशेनें येत असलेला दिसला. त्यांना पाहतांच मी त्यांचा हेतु ओळखला. ते बंगालमधून फंड जमविण्याकरितां आलेले संन्याशी होते. बंगाली पद्धतीचीं 'ओ'कारमय भजनें ह्मणत गेल्या वर्षी ते असेच आले होते. त्या वेळीं मीं त्यांना यथाशक्ति दोन रुपये मदत केली होती. पण पुनः त्यांना यंदांहि आलेले पहातांच मला भीति वाटली. दर वर्षी यांना दोन रुपये देणार कोठून ? बंगालमधून भिक्षा मागायला हे येथें येतात ! बडोद्यांत किंवा

५५१२



आमच्या इकडच्या प्रांतांत कांहीं कमी का भिक्षेकरी आणि फंड जमविणारे आहेत ? आम्ही इकडच्या मंडळींना मदत करायला हवी, का पलीकडच्या ? 'दानधर्माची सुरवात घरांत होते' अशा अर्थाची इंग्रजींत एक ह्मण आहे. घरांतल्या, गांवांतल्या, आपल्या जिल्ह्यांतल्या लोकांना प्रथम मदत करणें हें आपलें कर्तव्य कीं अकर्तव्य ? घरांतल्यांना उपाशी ठेवून घराबाहेरच्यांना भोजन घालण्यांत परार्थ साधत असला तरी, स्वार्थ आणि परमार्थ कांहीं साधत नाहीं. उपरोधात्मक अशी गुजराथींत एक ह्मण आहे–"घरना छोकरां घंटी चाटे, उपाध्याने आटो." ( घरांतील मुलें जात्याचें पाळें चाटतात, उपाध्येबुवांना मात्र पीठ मिळतें ! ) या ह्मणीची त्या वेळीं मला आठवण झाली. फार मोठ्या अर्थानें भारतवासी सर्व आपण एकच असलों, तरी त्यांतहि सोयीच्या दृष्टीनें कप्पे पाडणें अगदीं अवश्य आहे. रामेश्वरचे प्रश्न आपण काशींत जाऊन सोडवूं लागलों, कलकत्त्यांतील फंडाकरितां अमदाबाद येथील धनिकांना त्रास देऊं लागलों, तर त्यांत शक्तीचा आणि पैशाचा कितीतरी अपव्यय होईल. आतांच आलेले संन्याशी ध्यानांत घ्या. बंगाल ते बडोदें प्रत्येकीं जाऊनयेऊन चाळीस रुपये त्यांना नुसत्या भाड्याचे लागले असतील. ह्मणजे दहा संन्याशांमागें चारशे रुपये भाड्याचे घालवून नंतर हे फंड जमा

करणार ! मिळून मिळून असा किती फंड मिळणार ? आणि एक वर्ष मिळाला ह्मणून प्रत्येक वर्षी मिळेल असें थोडेंच आहे ? आणि मिळावा तरी कां ? प्रत्येक व्यक्तीला आणि प्रांताला आपापले प्रश्न आहेतच ना ?

या व अशाच विचारांनीं प्रेरित होऊन मीं त्या संन्याशांना यंदां चारच आणे देण्याचें ठरविलें. चार आणे दर वर्षी द्यायला जड नाहीं वाटणार. दोन रुपये प्रत्येक वर्षी द्यायचे ह्मणजे सामान्य मनुष्याला कठीणच. ह्या बंगाली संन्याशांच्या समोर वाटाघाट घालण्यांत अर्थ नाहीं; कारण प्रत्येक बंगाली मनुष्य हा जात्या वक्ता असतो. निरर्थक मोठमोठाले शब्द वापरावेत बंगाली मंडळींनीं. तेव्हां त्यांच्याशीं कांहींहि न बोलण्याचें ठरवून मीं माझ्या नांवाच्या पाटीवर ' घरांत ' च्या ऐवजीं ' घराबाहेर ' केलें; आणि माझ्या पत्नीच्या हातांत चार आणे त्यांना देण्याकरितां देऊन मी वरच्या मजल्यावर जाऊन बसलों. गच्चींतून संन्याशी आमच्या घरांत शिरत असलेले मी पहात होतों. एका संन्याशाची नजरहि माझ्याकडे वळलेली मीं पाहिली. तरी देखील मी जागच्याजागींच उभा राहिलों. पुढें पंधरा-वीस मिनिटांनीं ते फंडगुंड चालते झाले. माझ्या पत्नीशीं त्यांनीं इंग्रजींत बराचसा युक्तिवाद लढवून पाहिला. केसरींतले उतारे तिला दाखवून दिले. तिच्यासारख्या गृहिणीनें निदान दहा रुपये तरी द्यायला

हवे, असें तिला सांगून दहा रुपये दिलेल्यांची यादी काढून दाखविली. निदान सालाबादप्रमाणें दोन रुपये द्या, असेंहि पटविण्याचा प्रयत्न केला. परंतु माझे पैसे वांचविण्याची काळजी माझ्यापेक्षांहि माझ्या पत्नीला अधिक असल्यामुळें तिनें चारच आणे त्या संन्याशांच्या हातावर ठेवले. शेवटीं ते बहाद्दर संन्याशी ह्मणाले, ' दांडेकर तर घरांत आहेत. आह्मीं त्यांना वर उभे असलेलें बाहेरून पाहिलें. त्यांना विचारून पाहा. ' त्यावर तिनें उत्तर दिलें, ' तुह्मीं दुसऱ्या कोणाला तरी बघितलें असाल. शेजारच्या बिऱ्हांडातले गृहस्थ असतील. दांडेकर घरांत नाहींत हें त्यांच्या पाटीवरून समजलेंच असेल तुह्मांला.' संन्याशी उत्तर ऐकून चालते झाले, आणि आमचें नाटक अर्धवट यशस्वी व अर्धवट अयशस्वी असें पार पडलें.

संन्याशी गेल्यावर मात्र मी माझ्या वागणुकीविषयीं विचार करूं लागलों. मीं केलेल्या लहानशा नाटकाबद्दल मी दोषार्ह आहें कीं प्रशंसापात्र ? असत्य आचरण आणि असत्य भाषण असे दोन्हीं प्रकार आमच्याकडून घडले होते. स्वप्नांत दिलेलीं वचनेंदेखील पाळणाऱ्या आत्यंतिक ध्येयवादी हरिश्चंद्राच्या दृष्टीनें आमचें वागणें निंद्य ठरेल. परंतु संसारांतल्या अडचणींना स्वाभिमानानें तोंड देणाऱ्या वास्तववाद्याच्या दृष्टीनें मला वाटतें आमचें

करणें कांहीं वाइगें नव्हतें. जगाच्या व्यवहारांत टिकाव लागण्याकरितां हरघडीं आपणाला निरनिराळीं सोंगें घ्यावीं लागतात, हें नाहीं तें नाटक करावें लागतें. तसाच विचार




[ चित्रकार–गोलिवडेकर ] पृ. ५३

दांडेकर घरांत नाहींत हें त्यांच्या पाटीवरून समजलेंच असेल.

केला तर नाटक करणें हें मुळांत वाईट नाहीं. आपला हेतु चांगला असला, कोणाचेंहि वाईट होण्याचा संभव त्यांत नसला, तर केवळ सोयीसाठीं, स्वाभिमानासाठीं, विशिष्ट ध्येयासाठीं, खोटें बोलणें किंवा खोटें आचरण करणें ह्यांत मुळींच कुरूपता नसून एक प्रकारचें सौंदर्य आहे.

माझ्या माहितींतले एक मानी गृहस्थ होते. त्यांनीं



“ लेव जी बदाम ! ” [ चित्रकार—गोलिवडेकर ] पृ. ५६

कधींहि कोणाजवळ तोंड वेंगाडलेलें मीं पाहिलें नाहीं. वास्तविक ते आजन्म दारिद्र्याशीं झुंज खेळत होते. तरी बाहेरून त्यांची वागणूक सद्‌गृहस्थाला साजेशी असे. आठ-आठ दिवस त्यांनीं उपास काढलेले मीं

पाहिले आहेत. परंतु कोणीं जेवण्याविषयीं विनंति केल्यास ते म्हणत, ' आत्तांच मी जेवून आलों. तुम्ही जेऊन घ्या. उशीर होतो आहे. ' या गृहस्थासारखे किती तरी बाणेदार लोक आपल्या समाजांत आहेत. त्यांचेंहि सदोदित नाटकच चाललेलें असतें, पण केवढा मोठेपणा सांठविलेला असतो त्यांच्या नाटकांत !

एका खानदानी मुसलमानाची अशी गोष्ट सांगतात. तो रस्त्यानें जाई तेव्हां त्याच्या जाकिटाच्या एका खिशांत बदाम व दुसऱ्यांत चणे असत. जेव्हां त्याला भूक लागे तेव्हां तो चणे खाई. पण समजा त्याच वेळीं कोणी समोरून येतांना दिसला तर तो दुसऱ्या खिशांतील बदाम काढून त्याला म्हणे, ' लव जी बदाम ! ' ' चणे खावे लोखंडाचे, तेव्हां ब्रह्मपदीं नाचे ' असें म्हणणाऱ्या तुकारामबुवांनीं जर या मुसलमानाला पाहिलें असतें तर ते खात्रीनें असें म्हणते, ' चणे खावें स्वाभिमानें, तेव्हां खानदानी गाजे. '

सर्वांत जबरदस्त नाटक कोणाला करावें लागत असेल तर तें प्रेमाची देवघेव करूं लागलेल्या तरुण-तरुणींना. राजेमहाराजांपासून तों तहत गरिबांपर्यंत सर्वांना या बाबतींत उशिरां किंवा लवकर नाटक करावेंच लागतें. अगदीं वैदिक कालापासून हीं नाटकें चालत आलीं असून जगाच्या अंतापर्यंत तीं चालतील. फार

मोठें ध्वनिकाव्य असतें या नाटकांत; आणि रस किती असतो हें ज्यानीं असलीं नाटकें पाहिलीं, अनुभविलीं



असतील त्यांनाच कळणार. माझ्याचप्रमाणें पुष्कळांनीं असलीं मजेशीर नाटकें पाहिलीं असतील. एका कॉलेजियन युवतीच्या वेळापत्रकांत, 'संध्याकाळीं सहा ते सात पोएट्री (काव्य)' असें लिहिलेलें असे. ती तिच्या मातापितरांची एकुलती एक मुलगी होती. उगीच

त्या मुलीच्या नाटकाला कोण बरें नांवें ठेवील? [ चित्रकार–गोलिवडेकर ] पृ. ५८

तिच्या अभ्यासांत आपण कशाला या, अशा हेतूनें तिचे आईवडील संध्याकाळीं फिरायला जात. त्यांच्या पश्चात् ती

कोणत्या काव्याचा अभ्यास करी हें मीं सांगायला पाहिजे असें थोडेंच आहे ? आईवडिलांची मर्यादा संभाळण्याकरितां ' पोएट्री ' च्या नांवाखालीं आपल्या प्रियकराला भेटणाऱ्या त्या मुलीच्या नाटकाला कोण बरें नांवें ठेवील ?

वेल्स यांनीं आपल्या एका कादंबरींतल्या पात्राच्या तोंडून असें वदविलें आहे कीं, आधुनिक जग हें प्रायः सत्यापलाप व मिथ्याभास यांवर चाललेलें आहे. जें नसेल तें दाखविण्याचा व असेल तें झांकण्याचा खटाटोप आधुनिक जग करीत असतें. उदाहरणार्थ, मी विद्वान् नसलों तरी अनेक ग्रंथांचीं व ग्रंथकारांचीं नांवें सांगून वाचकांना गोंधळून सोडीन. मी श्रीमंत नसलों तरी उंची कपडे घालून लोकांना मी धनिक आहे, असें भासवीन. मला इंग्रजी मुळींच येत नसतांना आपण त्या भाषेंतील अगदीं दर्दी आहोंत असें मी पुष्कळसे इंग्रजी शब्द मुद्दाम वेळीं-अवेळीं वापरून लोकांना दाखवीन. मी सुस्वरूप नसलों तरी पॉवडर वगैरे लावून या बाबतींत, करतां आल्यास, इतरांची दिशाभूल करीन.

माझें यावर म्हणणें असें कीं, सर्वच प्रकारचे सत्यापलाप व मिथ्याभास हे कांहीं वाईट नाहींत. वर जीं उदाहरणें दिलीं आहेत, त्यांत देखील सत्य झांकून ठेवलेलें व असत्याचा आविष्कार केलेला आढळेल, म्हणून काय त्या त्या व्यक्ती निंद्य ठरतील ? कदापि नाहीं.

एकदां वर्गांत शिकवितांना याविषयीं बोलण्याचा प्रसंग आला असतांना जवळ बसलेल्या विद्यार्थिनींच्या नखरेबाज पोषाकासंबंधीं व पॉवडर वगैरे लावण्याच्या पद्धतीसंबंधीं मी सर्वसामान्यपणें चार शब्द नापसंतीचे बोलून गेलों. त्यानंतर त्या मुली माझ्याकडे आल्या व त्यांनीं, आपण मुद्दाम सुरेख नसतांना तशा आहोंत असें दाखविण्याकरितां चांगले कपडे घालीत नसून, चांगले कपडे घालणें आपणाला आवडतें म्हणून घालतों, असें सांगितलें. स्वच्छतेच्या दृष्टीनें आपणाला शोभतील असे कपडे वापरणें यांत कांहींच वावगें नाहीं. परंतु आपण सुस्वरूप नसतांना मुद्दामच तोंडाला रंगसफेती करणें, किंवा उगीचच लोकांचें लक्ष वेधलें जाईल अशा प्रकारचा अभिनय करणें, हें मात्र सत्यापलाप व मिथ्याभास या सदरांत पडूं शकेल.

कोणते सत्यापलाप किंवा मिथ्याभास खोटे या बाबतींत मला वाटतें एकच कसोटी असूं शकेल. आणि ती म्हणजे हेतूची. चांगल्या हेतूनें प्रेरित होऊन केलेलें कोणतेंहि कर्म वाईट ठरूं शकत नाहीं. जिथें हेतु शुद्ध वा निर्दोष असेल, त्यापासून कोणाचेंहि तादृश नुकसान होण्याचा संभव नसेल, तिथें कोणालाहि दोष काढायला जागा उरत नाहीं; निदान उरूं नये. कारण तेवढ्याच एका मुद्यावर मी माझ्या ‘ घराबाहेर ’ नाटकाचें समर्थन करीत आहे.

# नथिंग सीरियस

माझे एक साहित्यिक स्नेही आहेत. ते एकदां मला म्हणाले, ' तुम्ही लिहितां. ठीक आहे. चुटकेवजा लिहितां. परंतु नथिंग सीरियस. नथिंग दॅट विल लास्ट. ( तुम्ही गंभीर स्वरूपाचें किंवा टिकाऊ असें कांहीं लिहीत नाहीं. )

' तुमचें म्हणणें खरें आहे. ' अशा अर्थाचें कांहींसें उत्तर त्या वेळीं मीं त्यांना दिलें. नथिंग दॅट विल लास्ट, या त्यांच्या उद्गाराला ' नथिंग लास्टस् ' असलें उत्तर देण्याचें माझ्या मनांत असूनहि त्यांच्या विद्वत्तेकडे, वाङ्मयसेवेकडे–आणि सर्वांत मोठें कारण–वयाकडे पाहून मीं त्यांना कांहींच खरें उत्तर दिलें नाहीं. माझ्या मौनानें

जर त्यांना स्वतःकडे पाहून मोठेपणा आल्याचें समाधान मिळत असलें तर तें मिळूं दे त्यांना, असाच विचार



[ चित्रकार—के. दा. जोशी ] पृ. ६०
गंभीर स्वरूपाचं आणि टिकाऊ असं तुम्ही कांहीं लिहीत नाहीं.

मीं मनाशीं केला. गंभीर स्वरूपाचे, टिकाऊ स्वरूपाचे ग्रंथ निर्माण करण्यांत त्यांनीं आपल्या आयुष्याचा उपयोग केला होता. आणि या त्यांच्या तपस्येबद्दल मला आदर

असल्यामुळें, वेळ जाण्याकरितां म्हणून, त्या वेळीं त्यांच्याच ग्रंथराजांचीं मी वर्णनें व स्तुति करूं लागलों.

'नथिंग सीरियस' या आपल्या सूत्ररूप अभिप्रायानें सीरियस किंवा गंभीर वाङ्मयाचें महत्त्व किती, याचा विचार करायला माझ्या साहित्यिक मित्रानें मला भाग पाडलें. गंभीर वाङ्मयच जगांत टिकण्याच्या योग्यतेचें असतें व टिकतें, असें म्हटलें तर पुस्तकालयांत योगवासिष्ठादि वेदांतग्रंथच ठेवावे लागतील आणि बाकीच्या गंभीरेतर वाङ्मयाची हकालपट्टीच करावी लागेल. मला वाटतें, गंभीर वाङ्मयाची आवश्यकता जितक्या अट्टाहासानें या भरतभूमींत प्रतिपादिली जाते, इतकी अन्यत्र कोठें जात नसेल. इंग्लंडमध्यें 'लिटरेचर ऑफ नॉन्सेन्स'ला गंभीर वाङ्मयाइतकेंच महत्त्व देतात, आणि या 'निरर्थक' नव्हे परंतु 'निर्हेतुक' किंवा वाचाळ वाङ्मयाचा जनक ह्मणून सुप्रसिद्ध निबंधलेखक चार्ल्स लँब याचा केवढा गौरव इंग्रजी वाङ्मयांत केला जातो! जगांत इतर अनेक गोष्टींप्रमाणें गंभीर वाङ्मयाची जरूरी आहे यांत मुळींच शंका नाहीं. पुष्टिवर्धक अन्नाची जशी शरिराला आवश्यकता तशीच गंभीर वाङ्मयाची आपल्या मनाला व बुद्धीला. परंतु आहारांत ज्याप्रमाणें केवळ बलवर्धक पदार्थांचा भरणा न करितां चविष्ट आणि रुचकर अशा इतरहि पदार्थांचा समावेश करावा

लागतो, त्याप्रमाणें आपल्या मनाच्या व बुद्धीच्या क्षुधा शमनार्थ गंभीरेतर वाङ्मयाचीहि जरुरी आहेच आहे. महाराष्ट्रानें ज्ञानेश्वर–मुकुंदराजांपासून तों मोरोपंतांपर्यंत ' सीरियस ' वाङ्मयच निर्माण केलें आहे; ह्मणून काय तें सर्वच्या सर्व टिकाऊ स्वरूपाचें आहे ? वाङ्मयाचा टिकाऊपणा त्याच्या ठिकाणीं असलेल्या गांभीर्यावर का अवलंबून असतो ? तसें असतें तर मोलियर, शेक्स्पीअर, मार्क ट्वेन किंवा कोल्हटकर, गडकरी यांचें गंभीरेतर वाङ्मय टिकलेंच नसतें. आणि तसा अगदीं लांब्रट चेहरा करून गंभीरपणें विचार केला तर गंभीर वाङ्मयाची गादीदेखील आंतून पोखरलेलीच आढळेल. 'नथिंग लास्ट्स्' टिकाऊ असें कांहीं नाहीं ह्मणणें कोणाला आवडलें नाहीं तरी तें गंभीर सत्य आहे.

गंभीर वाङ्मयाचा आणि गंभीर गाष्टींचा आपण थोडा कमी विचार केलेलाच बरा. ललित किंवा खेळकर गोष्टींनाहि आयुष्यांत अवश्य स्थान असायला पाहिजे. कारण त्यांचेंहि महत्त्व कांहीं कमी नाहीं. जगांत अशा कितीतरी महत्त्वपूर्ण गोष्टी घडतात कीं, ज्यांचें मूळ गांभीर्यांत नसून खेळकरपणांत किंवा निर्हेतुकपणांत असतें. वॅट्स, सर आयझॅक न्यूटन, एडिसन इत्यादि संशोधकांनीं लाविलेल्या शोधांकडे पाहिले असतांना त्यांचें मूळ गांभीर्यांत नसून ' नथिंग सीरियस ' मध्यें असलेलें

आढळेल. किटलींतून निघणाऱ्या वाफेकडे गंमत ह्मणून पाहात असताना वाफेच्या शक्तीचा शोध वॅट्सला लागला. फळांफुळांच्या शोभेकडे पाहात मजेनें बागेंत बसला असतांना न्यूटनला गुरुत्वाकर्षणाचा शोध लागला. तोंडांत तार धरून ती गमतीनें छेडीत असतांना एडिसनला ग्रामफोनची कल्पना सुचली. हे संशोधक कपाळाला शेंकडों आंठ्या घालून का गांभीर्याचें चिंतन करीत बसले होते ? त्यांच्या क्रीडाविषयांत गंभीर विषय निर्माण झाले, विश्वसत्यें बाहेर पडलीं. असें सांगतात कीं, शेक्सपीयरच्या विदूषकांच्या तोंडून जितकें तत्त्वज्ञान प्रगट झालेलें आहे, तितकें इतर उच्च पात्रांच्या तोंडून झालेलें नाहीं. आपल्याकडे देखील गीतेसारखें तत्त्वज्ञान निर्माण झालें तें रसिकश्रेष्ठ व खेळाडू वृत्तीच्या श्रीकृष्णाच्या तोंडून !

आनंदी वृत्तीचा विचार केला तरी तिचा जन्म गांभीर्याच्या पोटीं नसून ' नथिंग सीरियस ' किंवा बेफिकिरींत असलेला आढळेल. प्रौढ स्त्रीपुरुष आणि लहान मुलें यांच्यांतील मुख्य फरक ह्मणजे प्रौढांच्या ठिकाणीं गांभीर्य असतें, मुलांच्या ठिकाणीं तें नसतें, हाच. पण तेवढ्यामुळें एकाला आनंदसाम्राज्य उपभोगायला मिळत असतें, आणि दुसरा बिचारा जड पावलांनीं जगांत वावरत असतो. गांभीर्यांत क्वचित् समाधानाचें सुख लाभूं शकतें; पण आनंद–निर्भेळ आनंद–प्राप्त होऊं

शकत नाहीं. निष्काळजीपणा किंवा बेफिकिरी हीं जितकीं आनंददायक होतात तितकें दुसरें क्वचित् कांहीं होत असेल. मला तर वाटतें, जगाकडे देखील बेफिकिरी वृत्तीनेंच बघितलेलें बरें. आयुष्यांतील चढउतारांवरून जात असतांना ' कांहीं फारसें नाहीं.. नथिंग सीरियस ' अशा भावनेनें जर आपण जाऊं लागलों तर आपणाला मुळींच त्रास व्हावयाचा नाहीं; उलट आनंदच वाटेल.

लहान मुलें खेळतात किंवा नाचतात; पक्षी गातात किंवा हवेंत उडतात; फुलें उमलतात व हंसूं लागतात—आहे का ' सीरियस ' कांहीं यांत ? पावसाळ्यांत जिकडे तिकडे हिरवेगार गवत पसरतें त्यांतहि काय ' सीरियस ' आहे ? कोणी फूटपट्टी घेऊन का तें मनोहर दृश्य निर्माण केलें आहे ? वायुलहरींबरोबर नाचणाऱ्या त्या गवताकडे पाहिलें कीं म्हणावेंसें वाटतें—कसला घेऊन बसलां आहांत गांभीर्याचा छंद नी हव्यास ! युवतीजनांच्या लीला, किंवा प्राकृत भाषेंत सांगावयाचें म्हणजे, बायकांचे चाळे, ज्यांनीं पाहिले असतील त्यांना त्यांत केवढी मौज वाटली असेल ? ते चाळे किंवा त्या लीला ' सीरियस ' का असतात ? पायाच्या अंगठ्यानें जमीन उकरण्यांत, आंबाड्यावरून तीनतीनदां हात फिरविण्यांत, ज्या बालरुमालानें कांहींहि पुसलें किंवा टिपलें जाण्याचा संभव नाहीं अशानें उगीचच नाका-

वरून किंवा तोंडावरून हात फिरविण्यांत, पदराशीं



चित्रकार : के. दा. जोशी.

पृ. ६५

युवतीजनांच्या या चाळ्यांत कांहीं
आहे का सीरियस ?

सं नि: ६०८



विनाकारण खेळत त्याचा चोळामोळा करण्यांत, अगर मनांत बोलावयाचें असूनहि तोंड फिरवून बसण्यांत कांहीं ' सीरियस ' आहे का ? गंभीर विचारानें प्रेरित झालेल्या का या क्रिया आहेत ? असें असून केवढें सौंदर्य, केवढी गंमत, त्यांच्या ठिकाणीं आहे ! अगदीं चराचर सृष्टि किंवा विश्वसंगीत यांचा विचार केला तरी त्यांची उत्पत्ति ' नथिंग सीरियस 'मध्यें असलेली आढळेल.. असें सांगतात कीं, सृष्टीच्या जन्मकालीं पुरुष हा निर्गुण, निराकार, निर्भाव, निर्मोह, अशा जड, गंभीर स्थितींत बसला होता. त्या वेळीं प्रकृति ही हंसत नाचत अल्लडपणें त्याच्या जवळ आली. तरी तो हंसेना, बोलेना, हालेना ! प्रकृतीला वाटलें, आहे तरी कोण हा असला प्राणी ? हा जिवंत तरी आहे का ? म्हणून सहज गंमत करण्याच्या हेतूनें तिनें त्याला स्पर्श केला. तों काय ! तो पुरुष हंसूं लागला, बोलूं लागला, डोलूं लागला ! प्रकृतीला वाटलें, एकंदरींत गमत्या आहे हा पुरुष ! राहिली ती त्याच्याजवळ. आहे का कांही सीरियस यांत ? परंतु यांतूनच पुढें साऱ्या सृष्टीची उत्पत्ति झाली. ' नथिंग सीरियस ' असेंच आपण म्हणाल. तीच तऱ्हा सूर्याची. लाखो योजनें पसरलेला हा प्रकाशाचा गोळा, हवेंत म्हणा किंवा पोकळींत म्हणा सुरवातीला नृत्य करीत होता जीवनसंगीतानें बेहोष झाला होता, मस्त झाला होता. नृत्यांत

कसला आला आहे गंभीरपणा ? सूर्य नाचत होता एकीकडे, आणि त्याच वेळीं तेजाचे गोळे त्याच्या शरिरांतून वेगवेगळे होऊन दूर फेंकले जात होते. सूर्याचेंच अनुकरण ते करीत होते. तेहि नाचतच होते. नाचतां नाचतांना त्यांच्यावर जीवसृष्टि निर्माण झाली, उन्नत दशेला पोचली. तिनें त्या गोळ्यांना नांवें दिलीं ! एकाचें नांव चंद्र, दुसऱ्याचें नांव मंगळ, तिसऱ्याचें नांव पृथ्वी, वगैरे वगैरे. आणि तेव्हांपासून आजपर्यंत सूर्य, तसेंच त्याच्यापसून उत्पन्न झालेले इतर ग्रह यांची रासक्रीडा चालूच आहे. नाचतां–नाचतांना एखादे वेळीं त्यांचा तोल जातो तेव्हां समुद्र असेल तिथें पर्वत दिसूं लागतो, आणि पर्वत असेल तिथें सरोवर निर्माण होतें. परंतु नाचणाऱ्या त्या ग्रहांना त्यांचा पत्ताहि नसतो. असें का त्यांना म्हणावयाचें आहे कीं–देअर इज नथिंग सीरियस ? असेलहि कदाचित्. नृत्याचा आनंद उपभोगणाऱ्यांना गांभीर्याची माहिती असेल कशाला ? आणि हवी तरी कशाला ?

# एकेकाची तऱ्हा

सुप्रसिद्ध कादंबरीकार सर वॉल्टर स्कॉट याच्या लहानपणची अशी एक गोष्ट सांगतात कीं, त्याला गुंड्यांना हात लावल्याखेरीज विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरेंच देतां येत नसत. ही त्याची तऱ्हा त्याच्या बुद्धिमत्तेचा हेवा वाटणाऱ्या एका वर्गबंधूनें लक्षांत ठेवून एके दिवशीं मारामारींत त्याच्या कोटाच्या गुंड्या उपटून टाकल्या. झालें; त्यानंतर त्या दिवशीं कुमार वॉल्टरला मास्तरांनीं विचारलेल्या प्रश्नांची केवढी गैरसोय वाटूं लागली ? एका प्रश्नाचेंहि उत्तर त्याला सुचेना. त्याची जीभ त्याच्या तोंडांत घुटमळूं लागली, आणि त्याच्या सर्वांगाला दरदरून घाम आला !

वॉल्टर स्कॉटचेंच कशाला? इतरहि मंडळींच्या कांहीं कमी का तऱ्हा असतात, बोलण्या चालण्याच्या? माझ्या माहितीचे एक सुप्रसिद्ध वक्ते आहेत. त्यांना बोलत असतांना आपल्या कॉलरच्या बटनाला हात लाव-ण्याची व त्याच वेळीं मान हलवून हवेंत काल्पनिक वर्तुळें काढण्याची संवय आहे. जसजसें त्यांचें व्याख्यान रंगत जातें, तसतसे हे विशिष्ट प्रकारचे हातवारे व हीं वर्तुळें अधिकाधिक होऊं लागतात. एकदां काय मौज झाली, त्यांचें व्याख्यान संपलें तरी मानेवर बोटें ठेवून वर्तुळें काढण्याची त्यांची ही क्रिया कांहीं संपेना! तेव्हां हा कांहीं वातविकार आहे कीं काय असें वाटून एक डॉक्टर त्यांच्या जवळ आले. तेव्हां ते इंग्रजींत ह्मणाले, "Don't you worry, doctor. I am in the best of moods. तुम्ही काळजी नका करूं डॉक्टर. मी अगदीं मजेंत आहे.)"

दुसरे एक गृहस्थ आहेत, त्यांना बोलतांना लिहि-ण्याची संवय आहे. 'अफ कोर्स, अफ कोर्स' (अलबत, कां नाहीं?) असें ह्मणून तुमच्याशीं बोलत असतांना, दौतींत टाक बुचकळून ते बोललेला मजकूर लिहितील! त्यांची ही तऱ्हा त्यांच्या नोकराला स्वाभाविकपणेंच त्रासदायक वाटत असल्यास नवल नाहीं. कारण कोणी दहापांच लोक येऊन गेले कीं, त्याला टिपकागद व साधे

कागद बदलून नवे ठेवावे लागतात. या त्रासाला कंटाळून पुढें मात्र त्यानें एक युक्तीच शोधून काढली. या सर्व अनर्थांचें मूळ दौतींत असणारी शाई आहे असें समजून त्यानें दौत कोरडी ठेवण्याचें ठरविलें. त्यानंतर त्याच्या धन्याची, रिकाम्या दौतींत टांक बुचकळून लिहिण्याची संवय जरी गेली नाहीं, तरी त्याच्या मागचा त्रास मात्र वांचला.

हॉलिवूड येथील जॉन फोर्ड नांवाच्या एका दिग्दर्शकाची तऱ्हा कांहीं वेगळीच आहे. शूटिंगचें काम चालू असतांना तो इतका कांहीं व्यग्रचित्त होतो कीं, त्याच्या मनांतील भावनांची क्षुब्धता हातरुमाल दातांनीं चावचावून तो व्यक्त करीत असतो. याकरितां त्याला आपल्या खिशांत बरेच हातरुमाल बाळगावे लागतात. त्याच्या खिशांतील हातरुमालांची होत असलेली ही दुर्दशा सौ. फोर्डसारख्या सुगृहिणीला कशी आवडणार ! तिनें एके दिवशीं मि. फोर्ड यांच्या खिशांत हातरुमालांच्या ऐवजीं मलमलीचे लहान लहान चौरस तुकडे घड्या करून ठेवले. त्या दिवशीं शूटिंगच्या वेळीं खिशांत हात घालतांच जॉन फोर्डला रुमालाऐवजीं दुसरेंच कांहीं आढळलें. मग काय ? त्या वेळीं त्याला दिग्दर्शनाचें काम करतां येईना. त्यानें सर्व काम थांबविलें. नोकराला घरीं पिटाळलें. आणि जेव्हां खिसा हातरुमालांनीं भरला आहे असें त्याला आढळलें, तेव्हा त्यानें शूटिंगकरितां आज्ञा दिली !

अशाच एका तऱ्हेच्या जोरावर एका वक्त्यानें एका सभेंत आपला ठराव पास करून घेतला ! त्याला बोलतांना टेबलावर ठेवलेले वजनाचे गोळे हातांत फिर-विण्याची संवय असे. एकदां एक ठराव मांडीत असतांना हातांतला गोळा प्रेक्षकांना दाखवीत तो ह्मणाला, "आपण हा ठराव पास कराल अशी माझी खात्री आहे." आणि मौज अशी कीं, एरव्हीं नामंजूर होणारा ठराव त्या गोळ्याच्या भीतीनें त्या दिवशीं मंजूर झाला !

बोलणाऱ्यांप्रमाणें गाणाऱ्या लोकांच्याहि किती तरी तऱ्हा असतात. ताना घेत असतांना हाताचीं बोटें व मान इतक्या कांहीं वेगवेळ्या प्रकारांनीं कांहीं गाणारे फिरवितात कीं क्वचित् त्यांच्या गाण्यानें करमणूक नाहीं झाली तरी असल्या अंगविक्षेपानें खास होते. कित्येक उत्तम गवय्ये गातांना इतकीं वाईट तोंडें करितात कीं त्यांना पडद्याआड बसवून गायला लावावेंसें वाटतें. अशा गाणाऱ्यांनीं निदान चांगले मुखवटे लावून गाण्याचा उप-क्रम करून बघण्याजोगा आहे. कर्णमधुर संगीत ऐकत असतांना डोळ्यांना जाचक होणारे मुखविक्षेप पाहिले कीं, उत्तम पुलावा खात असतांना लागलेल्या कठीण खड्याची आठवण होते.

लिहितां—लिहितां बोलण्याची वर तऱ्हा सांगितली. तशी लोळत असतांना गाणें ह्मणण्याची संवय एका

गायिकेला होती. बसून गाणेंच ह्मणतां येत नसे तिला! याचें कारण ती गाणें शिकली ती पलंगावर पडल्या पडल्या. तिचे वडील गाण्याची तालीम करीत. ती ती पडल्या पडल्या ऐके. एका बादशाहानें जेव्हां तिच्या गाण्याची कीर्ति ऐकून तिला गाण्याकरिता आपल्या महालांत बोलाविलें आणि गाण्याची विनंती केली तेव्हां तिच्या तोंडून एक सूरहि निघेना! आपली मुलगी उत्तम गाते, असें ह्मणून बादशाहाजवळ तिच्या बापानें फुशारक्या मारल्या होत्या. त्या आठवून त्याच्या नाड्या थंड होण्याची पाळी आली. तेव्हा होतें नव्हतें तेवढें सर्व अवसान एकवटून त्यानें रागाच्या भरांत मुलीच्या श्रीमुखांत भडकावली. त्यासरशीं मुलगी कोलमडून खालीं पडली. परंतु चमत्कार हा कीं पडल्याबरोबर रडण्याचे सूर निघण्याऐवजीं तिच्या मुखावाटे सुरेल संगीत स्रवूं लागलें!

अंगविक्षेपांच्या बाबतींत तर कमालीच्या तऱ्हा पाहावयास सांपडतात. एकजण रस्त्यानें असे चालतात कीं जणूं काय त्यांचें सर्व शरीर एखाद्या खोड्यांत अडकवून ठेवलेलें आहे. त्यांचेकडे पाहिलें कीं असें वाटतें, एखादा लाकडी पुतळाच तर रस्त्यानें जात नाहीं ना? याच्या उलट मोटरीचा हँडल मारल्यावर ती जशी थरथर हलते, तशी चालतांना सर्वांगाची हालचाल करणारे दुसरे एक गृहस्थ आहेत. त्यांच्याकडे पाहिलें की

वाटतें, हा मनुष्य एखाद्या कायमच्या भूकंपांत तर सांपडलेला नाहीं ना! हाताचीं बोटें मोडण्याची किंवा मानेला हिसका देण्याची किती तरी जणांना सवय असते. अशी मंडळी बसतील तिथें 'कट् कट् कट्' असा अवाज करीत सुटतील. मिशीला पीळ भरणारे मोठे मजेशीर लोक असतात. तो त्यांचा चाळा सुरू झाला कीं त्यापुढें त्यांना कसलीहि फिकीर वाटत नाहीं. कुठल्या तरी विचाराच्या तंद्रींत लागल्यावर, मिशांना पीळ भरल्यानें, त्यांना विचार करायला मदत होत असावी असें अनुमान करायला हरकत नाही. एका गृहस्थाला ही संवय इतकी लागली कीं, कांहीं प्रसंगामुळें त्याला आपल्या मिशांना रजा द्यावी लागली असूनहि त्याचें हात नेमके नेहमींच्याच जागीं जात!

स्त्रियांच्या वेगवेगळ्या तऱ्हांना 'चाळे' हें रूक्ष व गद्य नांव न देतां 'विभ्रम' किंवा 'ललित विभ्रम' असलें काव्यमय नांव देणेंच शोभेल. केवढें काव्य किंवा केवढी जादू असते या ललितविभ्रमांत! अर्थात् सर्वच स्त्रियांच्या ठिकाणीं हे विभ्रम पाहावयास सांपडणार नाहीत. कांहीं साध्याभोळ्या, 'अगदी हिंदु' अशा स्त्रिया असतात. त्यांच्या ठिकाणीं असले विभ्रम मुळींच संभवत नाहीत. अशाच एका सीध्या किंवा साध्या मुलीनें एकदां एक कादंबरी वाचायला घेतली होती. त्यांतील

नायिकेनें केलेले भ्रूभंग किंवा नयनविक्षेप यांचीं वर्णनें अनेक वेळां वाचून तिला वाटलें, आपणालाहि भ्रूभंग नाहीं का करतां येणार ? तिरक्या नजरेनें नाहीं का पाहातां येणार ? अशा विचारानें तिनें एका मोठ्या आरशासमोर स्वतःला उभे केले, आणि डोळ्यांची ही कसरत करून पाहाण्याचा खूप प्रयत्न केला ! पण व्यर्थ. तिला तें कांहीं केल्या साधेना. तेव्हां तिनें आपल्या मैत्रिणीला सांगितलें, " मेले कादंबरीकार भलभलतीं वर्णनें करतात. काय म्हणे भ्रूभंग ! नाठाळ मेले !" त्यावर त्या रसिक मैत्रिणीनें उत्तर देण्याच्याऐवजीं असे कांहीं मजेशीर डोळे करून तिच्याकडे बघितलें कीं, तिला त्या वेळीं पळूनच जावेसें वाटलें.

कुठल्याहि निरोगी आणि आनंदी युवतीच्या ठिकाणीं ललितविभ्रम हे असावयाचेच. तिचा तो स्वभावधर्म आहे. तिला ते केल्यावांचून चैन पडणार नाहीं. वृक्षाची पालवी नाही का नाचत ! वेली नाहीं का हलत–डुलत ? लाटा नाही का उड्या मारीत ? कळ्या नाहीं का लाजत ? तीच तऱ्हा कामिनींची. त्यांच्या डोळ्यांच्या हालचालींत इकडचें विश्व तिकडे करण्याचें सामर्थ्य असतें. त्यांच्या भ्रूभंगांत काय असतें हें सांगण्या-पेक्षां काय नसतें हेंच विचारणें जास्त शोभेल. एका स्त्रीनें आपल्या धनुष्याकार भुवया चढविलेल्या पाहून

एका सत्पुरुषाचा जागच्याजागीं तोल गेल्याचें मला माहीत आहे.

हें झालें चांगल्या विभ्रमांचें. याच्या उलट कांहीं विभ्रम मोठे गमतीचे असतात. केस किंवा डोकें कराकरा खाजविणें, पदर तोंडांत धरून त्याचा चोळामोळा करणें, किंवा आश्चर्यप्रदर्शक म्हणून जीभ बाहेर काढणें, इत्यादि प्रकार यांत येतील. माझ्या दृष्टीनें रूपवती अशा एका स्त्रीनें एके दिवशीं आश्चर्यप्रदर्शक म्हणून वीतभर जीभ बाहेर काढली ! त्या वेळीं अगदीं हुडहुडी भरल्यासारखें मला वाटलें.

कांहीं कांहीं लेखकांच्या तऱ्हाहि मोठ्या मजेशीर असतात. कोलरिजला अफूची गोळी ठासल्याखेरीज चैन पडत नसे. जॉन्सनला चहाचें कमालीचें वेड होतें. मेकॉलेनें त्याचें असें वर्णन केलें आहे–' He drank oceans of tea–चहाचे तो समुद्र पिई.' चेस्टरटनची प्रतिभा मदिरापानावांचून प्रसन्न होत नसे. हरिभाऊ आपटे आपल्या शरिरावर चाकू, कात्र्या, सुईदोरा, पेन्सिल, फाऊंटन पेनें, कागद इत्यादि वस्तूंचा फिरता बाजारच वागवीत असत. शब्दांच्या योग्य निवडीविषयीं एका फ्रेंच लेखकाला विशेष नाद असे. हा त्याचा नाद इतक्या कळसाला पोंचला कीं स्वतःच्या प्रियेच्या प्रणयपत्रांतहि भावना योग्य शब्दांत व्यक्त झाल्या आहेत किंवा

नाहीं हें तो पाही ! आणि तिला उत्तर देतांना प्रणयभाव व्यक्त करण्याच्या ऐवजीं तिनें केलेल्या अक्षम्य चुका दाखविण्यांतच त्याचें सारें पत्र भरून जाई ! असल्या तऱ्हेवाईक विद्वानाकडे पाहिल्यावर त्याच्याशीं जन्माची गांठ घालून घेतलेल्या साध्वीची कोणालाहि झालें तरी कींवच करावीशी वाटेल !

आपल्या इकडे विद्यमान लेखकांच्या खाजगी आयुष्यक्रमाची माहिती फारशी कोणाला नसते. तशी ती मिळवितां आल्यास नामांकित लेखकांच्या कितीतरी मजेशीर गोष्टी आपणाला कळतील. आपल्या राहत्या घरांत वारंवार बदल करण्याची तात्यासाहेब केळकर यांची वृत्ति पुष्कळांच्या परिचयाची असेल. हॉल असेल तेथें भिंत घालून खोली तयार कर. खोल्या असतील त्यांतील मधल्या भिंती पाडून त्यांचें हॉलमध्यें रूपांतर कर, छप्पर असेल तें काढून तिथें गच्ची कर किंवा गच्ची गळते आहे असें पाहून पुनः छप्पर कर, अशा मजेशीर आलटापालटी त्यांच्या घरांत नेहमीं होत असतात. तुह्मी त्यांना एकदां भेटून पुनः सहा महिन्यांनीं भेटायला गेलांत, तर चूकून आपण दुसऱ्याच्या घरांत तर आलों नाहीना, असें तुम्हांला वाटल्यावांचून मुळींच राहणार नाहीं.

मला मात्र या त्यांच्या वृत्तीचें मुळींच आश्चर्य वाटत नाहीं. कारण प्रत्येक व्यक्तीचें व्यक्तीमत्त्व असल्या तऱ्हां-

तूनच पाहावयास सांपडतें. आत्म्याचा खरा आविष्कार असल्या अनियंत्रित चेष्टांतून जसा होतो, तसा तो नियंत्रित, जाणिवेनें युक्त अशा व्यापारांत होत नाही. आणि म्हणून एखादी व्यक्ति तऱ्हेवाइक आहे असें समजतांच मला तिच्याविषयीं भयंकर प्रेमभाव वाटूं लागतो. या दैदिप्य-मान आत्म्याच्या सूक्ष्म छटा केव्हां एकदां पाहीन असें मला होऊन जातें. कारण एकेकाची ( किंवा एकेकीची ) तऱ्हा कांहीं औरच असते.

# पोरकटपणा

चोंच उघडी ठेवून मेघबिंदूंची मार्गप्रतीक्षा करणाऱ्या चातकाची संस्कृत कवींनीं केलेली कल्पना खरी नसली तरी रम्य आहे, अशी आमची सर्वांची खात्री त्या दिवशीं झाली. त्या दिवशींचा उन्हाळा ह्मणजे काय ! सर्वत्र होमकुंडच पेटल्यासारखें वाटत होतें. सूर्यास्त होऊन संध्याकाळ झाली तरी कढत कढत वाफा जमिनींतून निघत होत्या. पपीहा पक्ष्याचा हृदयभेदक आक्रोश सुरू होता—'प्यासाहुं, प्यासाहुं.' घरांतल्यापेक्षां बाहेर बरें, ह्मणून आह्मी मंडळी फेरफटका करावयाला निघालों. आकाशांत पश्चिमेकडे कांहीं मेघखंड दिसत होते. पावसाचें चिन्ह होतें तें. चिमण्या मातींत बसून धुळीनें शरीर माखून

घेत होत्या. त्याहि दर्शवीत होत्या पाऊस लवकर येणार ह्मणून. आमचीहि इच्छा होती कीं, पावसानें यावें आणि आह्मांस खूप भिजवावें. आह्मांला आमच्या धुला-ईच्या कपड्यांची पर्वा वाटली नाहीं. आकाशांत ढग जमा होऊं लागले, वारा वाहूं लागला. कांहीं पावसाचे थेंब पडले. कोणाकोणाच्या अंगावर ते पडले, याची आह्मी कौतुकानें चवकशी करूं लागलों. ज्यांच्या अंगावर थेंब पडले होते त्यांना वाटलें आपण धन्य होत. इतक्यांत पाऊसच जोराचा येऊं लागला. सरीवर सरी येऊं लागल्या. टपोऱ्या मोगऱ्याच्या कळ्यांचे हारच हार आकाशांतून पृथ्वीवर सोडल्यासारखें दिसत होतें. इतक्या जोरानें येत होत्या पावसाच्या धारा जमिनीवर, कीं खालीं सर्वत्र बुडबुड्यांचीं फुलेंच फुलें नाचत होतीं. आणि पृथ्वीची आतुरता वाफांच्या रूपानें प्रगट होत होती. पावसानें भूमातेला संतुष्ट केलें. जिकडे तिकडे पाणीच पाणी झालें. केवढें मजेदार दृश्य दिसूं लागलें. पावसाचा जोर कमी होऊन झिमझिम सुरू झाली. आह्मी आमचे भिजलेले कपडे पिळून टाकले, आणि परत यायला निघालों.

कागदाच्या नावा करून त्या पाण्यांत सोडण्यांत मुलें दंग झालीं होतीं. कांहीं मुलें पाण्यांत नाचत होतीं. पाणी पाहिलें कीं मुलांना नाचावेंसें कां वाटतें,

याचा शोध करून पाहण्याजोगा आहे. केवढें अगाध प्रेम असतें त्यांचें पाण्यावर! बेहोष होतात तीं पाणी पाहिलें म्हणजे. तसें पाहिलें तर आपलें सर्वांचेंच पाण्यावर प्रेम असतें. नदी, सरोवर, निर्झर, सागर हीं पाण्याचीं विविध स्वरूपें आपणाला नेहमींच आकर्षक वाटतात. ज्याला पाण्याचा खेळकरपणा पाहून थांबावेसें, त्यांत डुंबावेसें वाटत नाहीं, त्याच्यांत कांहींच पाणी नाहीं, असें खुशाल समजावें.

आम्ही जरा पुढें गेलों तों एक तरुण स्त्री घरांतून मुद्दाम बाहेर येऊन पावसाच्या झिमझिमीखालीं उभी राहिली. तिचें आमच्याकडे लक्ष नव्हतें. ती जवळजवळ नाचतच होती. तिला भिजवायला सांपडलें म्हणून पाव-साला आनंद झाला. आणि ती आनंदी युवती पूर्वीपेक्षांहि अधिक रेखीव व सुरेख दिसूं लागली.

पण याहीपेक्षां एक म्हातारी जेव्हां स्वतःच्या अंगणांत येऊन पावसाखालीं उभी राहिली तेव्हां आम्हाला खूपच आश्चर्य वाटलें आणि आनंदहि वाटला. त्या म्हातारीच्या ठिकाणीं मूलपणा ( किंवा मुलगीपणा ) अद्यापि शिल्लक असलेला पाहून आह्मांला पराकाष्टेचें समाधान वाटलें. मला त्या वेळीं सुप्रसिद्ध निबंधलेखक गार्डिनर याची आठवण झाली. त्यानें एके ठिकाणीं ' We must try to maintain the eternal

boy in us ’ अशा आशयाचा जो मजकूर लिहिला



[ चित्रकार—के. दा. जोशी ] पृ. ८१


ती जवळजवळ नाचतच होती.

आहे त्याचें स्मरण झालें. योग्यच नाहीं का गार्डिनरचें ह्मणणें ? प्रत्येकाच्या ठिकाणीं सुप्तावस्थेंत

मूलपणा, बालिशपणा, खेळकरपणा असतोच असतो. आपण उगीचच प्रौढपणाचें पांघरूण अंगावर आणि मनावर घेऊन बसलेलों असतों. सभ्यतेच्या आणि मोठेपणाच्या फाजील कल्पना उराशीं बाळगल्यानें आपण आपल्या आयुष्यांतील आनंदाला अकारणच मुकलेलें असतों. ज्यांना आपल्या ठिकाणीं असलेली बाल्यवृत्ति टिकवितां आली ते धन्य होत असेंच मी म्हणेन. संसाराच्या गाड्याला त्या बाल्यवृत्तीच्या स्प्रिंग्ज् किंवा रबरी धांबा लावल्या असतांना संसार दुःसह खात्रीनें होणार नाहीं. उलट संसाराचें रूपांतर एखाद्या क्रीडेंत झालेलें आपणाला आढळेल. आणि क्रीडेंतील किंवा खेळांतील जयापजयाचें जसें आपणाला कांहीं वाटत नाहीं, तसेंच संसारांतील सुखदु:खांचेंहि कांहीं फारसें वाटणार नाहीं.

माझ्या माहितींत अशीं कितीतरी स्त्री–पुरुष रत्नें आहेत कीं, ज्यांना संसारांतील सुखाची ही गुरुकिल्ली हस्तगत झालेली आहे. एक साठी उलटलेले गृहस्थ आहेत. परंतु त्यांच्या ठिकाणीं गांभीर्याचा लवलेश नाहीं. उपनिषदें वाचण्याऐवजीं ते कादंबऱ्या वाचणेंच पसंत करतात. हरिकीर्तनालाप ऐकण्याऐवजीं ते आपल्या नातवंडांचीं रडणीं–ओरडणींच ऐकत असतात. संतांशीं चर्चा करण्याऐवजीं ते मुलांबाळांशीं गोष्टी करण्यांत स्वतःला धन्य समजतात. आणि स्वतःच्या हातून किती

जप झाला याची मोजदाद न करतां बायकोबरोबर ब्रिझिक खेळून त्याचेच मार्क्स मोजीत बसतात ! ते पोराबाळांची, लेकीसुनांची इतकी थट्टा करतात कीं, त्यांच्या बायकोला मधून मधून म्हणावें लागतें, 'पुरे झाला हा पोरकटपणा !'



[ चित्रकार—के. दा. जोशी ]

' पुरे झाला हा पोरकटपणा '

त्यावर त्यांचें उत्तर ठरलेलें असतें. ते म्हणतात, "पोरकटपणा माझ्या पांचवीला पूजलेला आहे. तो आतां स्वभावधर्म बनला. आणि स्वभावाला औषध नसतं हें तुला माहीतच आहे. कोणीं तुला विचारलं, ' तुमचा नवरा असला कसला ? ' तर त्याला किंवा तिला म्हणावं,

' साठी बुद्धि नाठी. ' " असलें उत्तर ऐकून त्यांची पत्नी निरुत्तर होत असेल हें सांगणें नलगे.

कांहीं दिवसांपूर्वी आमच्या घरीं एक वृद्ध संन्यासी आले होते. आम्हांला माहीत नसलेलीं जंगलांतील कितीतरी सौंदर्यस्थळें त्यांनीं आम्हांला दाखविलीं. आमच्याबरोबर ते अनवाणी पायांनीं चालत. गांव जरा मागें राहिला कीं धांवायला सुरवात करीत. रस्त्यानें जातांना झाडांवर करवंदें किंवा जांभळें दिसलीं तर लहान पोरांप्रमाणें तीं तोडून खात व आम्हांला देत. आणि आह्मी परशुरामकुंडावर गेलों तेव्हां तर त्यांनीं त्या पाण्यांत इतका खेळ केला कीं, आह्मां तरुणांना त्यांनीं लाजविलें. पोहण्याचे निरनिराळे प्रकार, उड्या मारण्याच्या वेगवेगळ्या तऱ्हा, त्यांनीं आह्मांला सप्रयोग दाखविल्या. त्यांच्या अंगीं पोरकटपणा असलेला पाहून, त्यांच्याविषयीं आह्मांला वाटत असलेल्या आदरांत प्रेमाची भरच पडली.

पुष्कळांची अशी समजूत आहे कीं मोठ्या माणसांनीं जरा दुरूनच जगाच्या खेळाकडे बघावें; लहान मुलांशीं जरा दुरूनच बोलावें चालावें; असें केल्यानें आपला आब राहतो, आपलें वजन राहतें. माझ्या मतें या विचारसरणी इतकी फोल विचारसरणी अन्यत्र पाहूं जातां सांपडावयाची नाहीं. आपल्यापेक्षां वयानें, बुद्धीनें लहान असलेल्यांचें प्रेम व सहानुभूति हीं

संपादावयाचीं असल्यास, त्यांच्यांत मिसळलेंच पाहिजे, त्यांच्याशीं समरस झालेंच पाहिजे. आपल्यांत जर कांहीं गुणविशेष असतील तर इतर आपणाला योग्य तो मान देतील. त्याकरितां मोठेपणाचें, वृद्धपणाचें खोटें अवडंबर नको माजवायला. खरा मान आणि खरा आदर हीं मागून मिळत नसतात. हिमालयाला पाहून आपलें मस्तक नमतें तें त्याच्या ठिकाणीं असलेल्या स्वयंभू महनीयतेमुळें. तो जसा हिमाचा मुकुट धारण करतो, तसाच क्षुद्र निर्झरांनाहि आपल्या अंगावर, खांद्यावर बागडूं देतो.

आणि तसाच विचार केला तर, दुसऱ्यांनीं आपल्या पोरकटपणाकडे पाहून आपला जो मान ठेवाव याचा तो नाहीं ठेवला तर नाहीं. त्या मानाकरितां आपण आपल्या आयुष्यांतील आनंद घालवावयाचा कीं काय? दुसऱ्यांची पर्वा आपणाला हरघडीं पाहिजे कशाला? आपण आपणाला वाटेल तसें खुशाल वागावें. कधींहि वृद्ध न होणाऱ्या पिटरपॅनची कल्पना इंग्रज लोकांनीं करून त्याचा पुतळाहि उभारला आहे. आपण शरिरानें वृद्ध झालों तरी मनानें कां व्हावें, हें मला कळत नाहीं. शरीर आणि मन हीं अन्योन्याश्रयी आहेत, हें मला कबूल आहे. तरीपण त्या दोघांत मनाचा मोठेपणा निर्विवाद आहे. खेळकर मनाचा शरिरावर परिणाम फार होतो. ज्या वृद्ध स्त्रीपुरुषांच्या ठिकाणीं पोरकटपणा वसत

असतो, तीं शरिरानें देखील चांगलींच निरोगी आणि टुणटुणीत राहतात.

आपलें मन हें कांहींसें पोलादी कमानीसारखें आहे. त्याला फार ताण सहन होत नाहीं. गंभीर विचारांचा त्याच्यावर फार दाब असला तर त्याच्या ठिकाणीं असलेला लवचीकपणा नाहींसा होतो. तें मुर्दाड बनतें. त्याला लवचीकपणा ठेवण्याकरितां बालिशवृत्तीचा जेवढा उपयोग होतो तेवढा कशाचाहि होत नाहीं.

या बाबतींत एक मजेदार गोष्ट आठवली ती सांगतों. जगप्रसिद्ध तत्त्वज्ञानी इसॉप याची कीर्ति ऐकून एक भला मनुष्य त्याला भेटायला आला. त्याची कल्पना अशी होती कीं, इसॉप जमिनीकडे पाहात कुठल्यातरी गहन विषयाच्या चिंतनांत गुंतला असेल. त्याऐवजीं इसॉप आपल्या मुलांबाळांशीं बालिश क्रीडा करीत असलेला पाहून त्या भल्या गृहस्थाच्या मनाला जबरदस्त धक्का बसला ! इसॉपसारख्या तत्त्वज्ञानी पुरुषानें लहान मुलांशीं पोरकटपणानें खेळणें ह्मणजे काय होय, असें त्याला वाटलें. परंतु आल्यासारखें इसॉपला नमस्कार वगैरे करून त्यानें आपली शंका विचारली. त्याबरोबर इसॉप हंसला आणि त्यानें घरांतून दोरी काढून ठेवलेलें धनुष्य आणून त्या मनुष्यासमोर ठेवलें. तरीहि त्याचें समाधान न झालेलें पाहून तो ह्मणाला, '' आपलें मन

ह्या धनुष्यासारखें आहे. त्याला चोवीस तास दोरी बांधून ठेवली तर तें पाहिजे तेव्हां वांकावयाचें तर नाहींच नाहीं, उलट तुटून मात्र जाईल.'

मनाचा ताण सैल करायला पोरकटपणाशिवाय दुसरा चांगला उपाय नाहीं. आणि ह्मणूनच त्या ह्मातारीला जेव्हां पावसांत भिजतांना मीं पाहिलें तेव्हां तिच्याविषयीं मला धन्यता वाटली. लहान मुलीच्या ठिकाणीं शोभणारी तिची बालिश वृत्ति पाहून, आह्मांला आमच्या भिजलेल्या कपड्यांचें कांहींच वाटलें नाहीं. आह्मी सर्व तिचाच विचार करीत घरीं परतलों.

# आपलीं मतें

'पुरुषांना मिशा आल्या कीं मतं येतात, असं गडकरी ह्मणतात.' एक गृहस्थ ह्मणाले.

'आणि बायकांना?' दुसऱ्या गृहस्थानें पृच्छा केली.

'ऑर्डर, ऑर्डर,' तिसरे गृहस्थ उद्गारले.

'चर्चा भलतीकडे वाहूं लागली.' एक वयस्कर सज्जन ह्मणाले.

'पण मग मिशा काढणाऱ्यावर मोठीच आपत्ती आली म्हणावयाची!' दुसऱ्या गृहस्थानें तोंड उघडलेंच.

‘ खरा मुद्दा तो नाहीं. मतं हीं आपलीं का दुसऱ्या कोणाचीं, हा मुद्दा आहे ’ पुन्हा वयस्कर गृहस्थानें चर्चेला दिशा लावण्याच्या उद्देशानें सांगितलें. त्यांच्या बोलण्याचा आशय लक्षांत घेऊन प्रो. मेडूँडो ह्मणाले, ‘ आपली मतं हीं आपलीं नव्हत. ’

दुपारच्या चहाच्या वेळीं, सध्यांच्या राजकारणांत निवडणुकी व मतें यांची धुमश्चक्री चालली असल्यामुळें आमच्याहि चहाक्लबांत या विषयावर मजेचे वादविवाद चालत. आजहि याच गोष्टीवर चर्चा सुरू होऊन, वर सांगितल्याप्रमाणें प्रो. मेडूँडो यांनीं सूत्ररूपानें आपला अभिप्राय कळविला, आणि त्यांच्या नेहमींच्या संवयीप्रमाणें डोक्याच्या मागच्या केसांना कुरवाळायला त्यांनीं सुरवात केली. त्यांच्या उत्तरानें अधीर बनलेल्या श्रोत्यांनीं त्यांना एकाच आवाजांत विचारलें, ‘ मतें आपलीं नव्हेत ह्मणतां ? मग तीं कोणाचीं ? ’

‘ कोणाचीं ! मतं परिस्थितीचीं. ’ शांतपणें प्रो. मेडूँडो यांनीं उत्तर दिलें.

‘ अजूनहि स्पष्टीकरण हवं ’ एक गृहस्थ ह्मणाले.

‘ मी सांगतों. मतं पैशाचीं, रुपयांचीं, नोटांचीं ’ सात्विक संतापानें दुसरे एक गृहस्थ ह्मणाले.

‘ कांहींतरीच ! ’ अज्ञानाचें सोंग घेऊन पहिले गृहस्थ ह्मणाले.



[ चित्रकार—के. दा. जोशी ] पृ. ९०
आमच्याहि चहाक्लबांत या विषयावर मजेचे वादविवाद चालत.

'तुह्मांला अंदरकी बात माहीत नाहीं म्हणून अशी शंका घेतां. म्युनिसिपल इलेक्शन घ्या. त्यांत टांगे-वाल्यांना आणि मिलमजुरांना पांच पांच रुपयांच्या नोटा देऊन मतं हस्तगत केलेलीं असतात. कौन्सिल, असेंब्ली, कौन्सिल ऑफ स्टेट इत्यादि मोठ्या निवड-णुकींतहि हाच प्रकार मोठया प्रमाणांत अवलंबिला जातो. तिथं तर मतं मिळवून देणारे अडत्ये नेमलेले असतात. आणि या अडत्यांना शंभर टक्के राष्ट्रीय ह्मणविणारे उमेदवाराहि निःशंकपणें मुशाहिरा चालू ठेवतात. निवडणुकीच्या रात्रांत ज्याचा हात मुळींच ओला झाला नाहीं, असा मनुष्य सांपडणं कठीण. मतं पैशाचीं, हें जें मीं ह्मणतों तेंच खरं.' आपल्या मूळपदावर येत दुसऱ्या गृहस्थानें विजयी मुद्रेनें आमच्याकडे बघितलें. आपल्या बोलण्याचा आमच्यावर परिणाम झालेला पाहून उत्तेजित होऊन तो पुन्हा ह्मणाला, 'तुह्मांला महंमदभाईची गोष्ट माहीत आहे ?'

'नाहीं.' शरणागतीच्या आवाजांत आह्मी ह्मणलों.

"महंमदभाई हा एक अडत्या होता. त्याचें धिप्पाड शरीर व मजबूत लाठी पाहून लोक त्याला घाबरत. एका निवडणुकीच्या वेळीं एका रावसाहेबांच्या विरुद्ध त्यानें भर सभेंत भाषण केलें. 'रावसाबको अपना मत देना हराम है' असें त्यानें मतदारांना

सांगितलें. कारण, त्याला विरुद्धपक्षाकडून त्या रात्रीची शराब मिळावयाची होती. झालें या गोष्टीची हकीकत रावसाहेबांना कळून त्यांनीं महंमदभाईला भेटीस बोलावलें व त्याच्या भाषणाची तारीफ करीत हळूंच एक शंभर रुपयांची नोट त्याच्या हातांत ठेवली ! त्याचा परिणाम दुसऱ्या दिवशीं संध्याकाळीं पहावयास सांपडला. महंमदभाई अस्तन्या सांवरीत मतदारांना ह्मणाले, ' यार, कल बोलनेमें गलती हो गई. रावसाब हमारे बडे प्यारमें है. हम उनके घरमें बैठे हुए उनसे दिल्लगी करते है. हम हमारा मत उनको न देंगे तो फिर किसीको देंगे ? उनके जैसा खानदानी और सच्ची जबानका पुरुष कहो, या अदमी कहो, न है आज तक हुवा, और न है होनेवाला. ' बोला आतां ! "

' थ्री चीअर्स टु महंमदभाई, ' आह्मी सर्वजण उद्गारलों.

' मतं परिस्थितीचीं हें जें मीं सांगितलं त्याचाच अनुवाद माझ्या मित्रानं केला. ज्या परिस्थितींत ज्या जागेवर आपण असूं, तिथलीं मतं हीं आपलीं मतं, कुठल्यातरी पौराणिक काळांत लोकांना स्वतःचीं मतं असत. आमच्याकडे जीझस, पीटर, गॅलिलिओ यांना स्वतःचीं मत होतीं. तुमच्याकडे मनु, याज्ञवल्क्य, किंवा

आधुनिक काळातील टिळक, गांधी यांना स्वतःचीं मतं होतीं व आहेत. परंतु सध्यांच्या जमान्यांत स्वतःचीं प्रामाणिक मतं असणं व तीं टिकवणं हें मूर्खपणाचं किंवा महात्मेगिरीचं समजलं जातं. कॉन्शन्स किंवा सदसद्विवेकबुद्धि हिचा मुद्दाच सध्यां कोणीं उपस्थित करीत नाहीं. कोणाला त्याची जरुरीच भासत नाहीं. अतिशय सोज्ज्वळ किंवा पवित्र समजल्या जाणाऱ्या विश्वविद्यालयांत निवडणुकींचेंच ध्याना. जिकडे तिकडे एकच प्रकार आढळून येईल. पदवीधरांचा जर अधःपात कुठें पहावयाचा असेल, तर तो असल्या निवडणुकीच्या प्रसंगीं. मघां उल्लेखिलेले बिचारे अशिक्षित टांगेवाले बरे, पण हे पढतमूर्ख नकोत, असें म्हणण्याची पाळी आली आहे. माझें मत कांहींहि असो, मी अमुक संस्थेंत आहे ना, मी तमुक मनुष्याला तो कसलाहि असला तरी मत दिलंच पाहिजे! विद्वानांना हृदय आणि मन हीं नसतातच का? नसतातच किंवा नसावींतच, असं ज्यांच्या हातीं सत्ता असते त्यांना वाटतं. बरं आहे बाकी तेवढाच त्रास कमी. विचार नको करायला. आपलीं मतं हीं आपलीं नव्हेतच.'

'राजकारणांत वेगवेगळे पक्ष असतात. त्या पक्षांतील व्यक्तिमात्राला कुठं असतात स्वतःचीं मतं? किंबहुना असे कितीतरी लोक आहेत कीं, ज्यांनीं

दर सहा महिन्यांनीं पक्ष बदलून आपलीं मतं बदललीं आहेत. लग्न झाल्याबरोबर स्त्रिया जशा कु. च्या सौ. होतात, आपलं नांव किंवा आडनांव बदलतात, तीच तऱ्हा या पक्षांतराची व मतमतांतराची. नांव बदललें जातांना स्त्रिया कधीं तक्रार करतात कां? मग मतपरिवर्तन होतांना आपल्या कॉन्शन्सनं किंवा सद्बुद्धीनं तरी कां तक्रार करावी? वकिलांना बाप-ड्यांना कुठं असतात स्वतःचीं मतं? जो पैसे देईल त्याच्या बाजूचं त्यांचं मत असतं. आज ज्याच्या बाजूनं आपण भांडलों, त्याच्या विरुद्ध उद्यां बोलायला ते तयार नसतात का? मत याचा अर्थ शांत विचार असा केला तर शांतपणानं विचार करायला वकिलांना वेळच कुठें असतो?' मी म्हणालों.

'म्हणजे असं कीं, ज्यांच्याजवळ विचार आहेत, त्यांच्याजवळ शांतपणा नाहीं व ज्यांच्याजवळ शांतपणा आहे, त्यांच्याजवळ विचार नाहींत, अशी सध्यां सुधार-लेल्या जगाची स्थिति आहे.' दुसरे एक गृहस्थ म्हणाले.

'आणि ज्यांच्याजवळ दोन्ही आहेत—त्यांना सत्तेची तरवार अहोरात्र भेडसावीत असते.' प्रो. मेडूंडो म्हणाले, 'तात्पर्य काय, आपलीं मतं हीं आपलीं नव्हेत.'

'अगदीं न्यायासनावर बसलेला न्यायाधीश घ्या. त्याला तरी सर्वच बाबतींत कुठं स्वतःचीं मतं असतात ? स्वतंत्रपणें व निःपक्षपातीपणानं न्यायाधीश आपलं मत जाहीर करतो असं नेहमीं समजण्यांत येतं. परंतु या त्याच्या मतालाहि देशकालाची मर्यादा आहेच. मातृभूमी-करितां मनुष्यानं मरायला किंवा मारायलाहि तयार असलं पाहिजे, अशा प्रकारची भाषा एखादा न्यायाधीश—जर तो परकीय सत्तेचा नोकर असेल तर—दंडार्ह समजेल. राजकीय स्वरूपाच्या सर्व खटल्यांत न्यायाधीशाला देखील स्वतःचीं अशीं मतं नसतात. त्याच्या हातांतील न्यायाचा तराजू राजकीय सत्तेच्या हातीं, त्या वेळेपुरता तरी असतो. आपलीं मतं हीं आपलीं नव्हेत, हें जें प्रो. मेंड्रो म्हणतात तेंच खरं.' मी म्हणालों.

त्यावर दुसरे एक गृहस्थ म्हणाले, 'कित्येक वेळां मतपरिवर्तनाचीं कांहीं मजेशीरहि उदाहरणं पाहावयास सांपडतात. प्रथम मतपरिवर्तन व नंतर आचारपरिवर्तन झालेले कांहीं लोक माझ्या पहाण्यांत आहेत. आणि हें त्यांचं परिवर्तन अगदीं हास्यास्पद असं होतं. मी पुण्यास असतांना तिथल्या लॉ-कॉलेजांत कांहीं मद्रासी विद्यार्थी होते. हे विद्यार्थी मोठे सनातनी विचारांचे असत. प्रथम जेव्हां ते कॉलेजांत येत, त्या वेळीं त्यांचीं मुखकमळें कानां-तील कर्णफुलांनीं व डोक्यावरील भल्या मोठ्या अंबाड्यांनीं

विभूषविलेलीं असत. अगदीं अस्मान कोसळलं तरी आपण आपले अंबाडे छाटायला तयार नाहीं, असं ते आम्हांला सांगत. आणि पुढं पहावं तों पंधरा दिवसांनीं आपले अंबाडे न्हाव्याला विकून त्या पैशाचे काबुली चणे खात लकडीपुलावरून ही मंडळी जातांना दिसत. आम्हीं या बाबतींत त्यांना हटकलं असतांना ते म्हणत ' यू नो, दॅट इज अव्वर मॅड्रास वे ऑफ इकॉनॉमी. '

' वाहवा ! ' आम्ही सर्वजण म्हणालों.

' दुसरी एक संस्था मला माहीत आहे. त्या संस्थेंतील लोकांना वाटतं कीं, आपल्यामुळं हिंदुधर्म तगून राहिला आहे. आणि यामुळं जो जो नवीन मनुष्य या संस्थेंत दाखल होतो, तो तो या धार्मिक दडपणाखालीं दबून गेल्यासारखा दिसतो. त्या संस्थेंत गेलों कीं आपली वागणूक व मतं अमुक प्रकारचीं असलींच पाहिजेत, असं तिथल्या लोकांना वाटतं. माझ्या माहितींतला एक चांगला गोरागोमटा व दिसायला सुंदर असा तरुण होता. बाहेर असतांना त्याच्या डोक्यावर केंस व डोक्यांच्या आंत सुधारकी विचार असत. तो अंगांत हाफ् कोट व पायांत तुमान घाली. परंतु तोच त्या संस्थेंत शिरल्याबरोबर त्यानें कोटाऐवजीं एक बाराबंदी शिवून अंगांत अडकविली, पायांत तुमानी ऐवजीं धोतर नेसविलं, डोक्यावरील केंस कापवून तिथं घेरा व शेंडी याची

स्थापना केली, कानांत भोंक पाडवून त्यांत भिकबाळी लटकविली, आणि डोक्याला पांढरा रुमाल व पायांत पुणेरी जोडा घालून तो ' गोमाता की जय ' असं म्हणत लोकांना रस्त्यावर अभिवादन करूं लागला ! प्रो. मड्रूडो म्हणतात त्याप्रमाणं आपलीं मतं हीं आपलीं नव्हेत असं त्यावेळीं मला वाटलं ' आपलें बोलणें संपवीत दुसऱ्या गृहस्थानें सांगितलें.

' हिंदींत एक म्हण आहे–पानी तेरा रंग कैसा जिसमें मिलावे वैसा. पुष्कळ लोक असेच असतात. त्यांना स्वतःचा रंग नसतो. आणि सरड्यांना कुठें असतो स्वतःचा रंग ? ' मी म्हणालों.

' म्हणजे, मी म्हणतों तेंच खरं तर ? आपलीं मतं हीं आपलीं नव्हेत. ' प्रो. मेड्रूडो हंसत व चहाचा शेवटला घोंट घेत म्हणाले.

# गव्हाणींतील कुत्रा

कांहीं दिवसांपूर्वी मी आणि प्रो. मेड्रॅडो असे दोघे पुण्याहून मुंबईस कांहीं कामाच्या निमित्तानें चाललों होतों. प्रो. मेड्रॅडो हे नेहमीं सेकंड क्लासनें प्रवास करीत. परंतु मी बरोबर असल्यानें त्यांनीं तिसऱ्या वर्गानेंच प्रवास करण्याचें ठरविलें. आम्हीं सकाळच्या पूना एक्सप्रेसनें जाण्याचें योजिलें होतें आणि गाडी सुटायला अद्यापि पंधरा मिनिटें अवकाश होता. आपला बिस्तरा लाकडी बांकावर पसरीत प्रोफेसर म्हणाले बैस आतां यावर. हा आतां आपला सेकंड क्लासच्याहि वरचा क्लास झाला.'

'अलबत्' मी म्हणालों.

आपल्या डोक्याला उजव्या हाताच्या आंगठ्या जवळचें बोट लावीत मेड्डो साहेब म्हणाले, 'माणसाजवळ हें असलें कीं तो वाटेल तिथें आनंदांत राहू शकतो. यांतच कांहीं नसलें कीं आटोपलेंच समजा.'

'खरं आहे,' मी म्हणालों. इतक्यांत साहेबी पोषाख केलेले, तोंडांत पाइप असलेले, हातांत टाइम्स व कांहीं मराठी मासिकें घेतलेले, दोन उंच महाराष्ट्रीय गृहस्थ लगबगीनें डब्यांत शिरले. त्यांच्याबरोबर असलेल्या हमालानें त्यांचें सामान वरच्या बांकावर ठेविलें, आणि पैशाकरितां त्यांच्यासमोर हात पसरला. त्या हातावर त्यांच्यापैकीं एकानें एक आणेली टाकली. ती पाहून हमाल सर्दच झाला आणि म्हणाला, 'काय रावसाहेब, किती बोजा आणला, तो पहाल कीं नाहीं?' त्यावर दुसरा गृहस्थ म्हणाला, 'जा, जा, गाडी सुटायची वेळ झाली.'

'आणि बोजा आणला म्हणतोस, काय आम्हांला उचलून आणलेंस कीं काय?' बोबड्या आवाजांत पहिला गृहस्थ उद्गारला. तोंच गाडी सुरू झाली. हमालानें दोन शेलक्या शिव्या हांसडल्या. त्याला उद्देशून दोघेहि 'साहेब' एकाआवाजांत म्हणाले 'डॅम रास्कल' आणि खो खो खो करून खूप हसले. पुढें दोघांनींहि एकीकडे पाइप ओढीत टाइम्स वाचायला सुरवात केली. ती थेट लोणावळ्याच्या स्टेशनापर्यंत.

५७१२


आह्मीहि इकडे ताजीं वर्तमानपत्रें चाळूं लागलों. त्यांत कांहीं आमचीं व बरींचशीं इतरांचीं होतीं. आमचीं पत्रें इतर उतारू वाचीत होते व त्यांच्या पत्रांचा आह्मी समाचार घेत होतों. अशा तऱ्हेनें मोठ्या खेळीमेळीनें आमची ज्ञानाची किंवा माहितीची देवघेव होत होती. खेळीमेळीनें ह्मणण्याचें कारण असें कीं परस्परांचीं वर्तमानपत्रें वा मासिकें वाचायला घेतांना आह्मी ' आपलें पत्र जरा देता कां वाचायला ? ' या शिष्टाचाराचा अवलंब करीत नव्हतों. आम्हांला त्याची जरुरी भासली नाहीं. एक प्रकारच्या हक्कानें आम्हीं हें ज्ञानसत्र चालविलें होतें. प्रो. मेडूॅडो हे पाश्चिमात्य रीतिरिवाजांत मुरलेले. परंतु त्यांनाहि या अशा वागण्यांत कांहीं वावगें वाटलें नाहीं. किंबहुना त्यांनींच मला मघां उल्लेखिलेल्या ' साहेबां ' जवळ पडून राहिलेल्या सचित्र मासिकांपैकीं एक उचलायला सांगून स्वतःला देण्याविषयीं विनंति केली. आणि येथेंच खरी गंमत घडली.

प्रो. मेडूॅडो यांनीं सांगितल्याप्रमाणें त्या काळ्या साहेबांच्या मासिकांपैकीं एक उचलून मीं त्यांना दिलें. मेडूॅडो यांना मराठी कांहीं वाचतां येत नव्हतें, परंतु चित्रें पाहण्याच्या उद्देशानें त्यांनीं तें मासिक चाळून पहायला सुरवात केली. आणि झालें ! एका साहेबांचें लक्ष त्या मासिकाकडे जाऊन त्यांचें डोकें भणाणलें.



त्यांनीं खुणेनें आपलें मासिक



परत करायला सांगितलें ! पृ. १०४

त्यांनीं मेड्डॅडो यांना खुणेनें ( बोलण्या इतकी त्यांच्या ठिकाणीं नम्रता नव्हती. ) आपलें मासिक परत करायला सांगितलें. ! बरें त्यानंतर त्यांनीं तें मासिक वाचलें का ? मुळींच नाहीं. तें त्यांच्याजवळ तसेंच पडून राहिलें होतें. त्यांनीं स्वतः त्यांचा उपयोग केला नाहीं. व प्रो. मेड्डॅडो यांना करूं दिला नाहीं. आम्हां सर्वांनांच त्यावेळीं या गोष्टीचें आश्चर्य वाटलें. केवळ शिष्टाचाराचा विचार केला असतां, आम्ही त्यांना विचारून त्यांचें मासिक उचलायला हवें होतें; परंतु न विचारण्यांतहि आम्ही कांहीं त्यांचें डुकर मारलें असें आम्हांला वाटत नाहीं. गर्दीच्या रस्त्यानें जातांना आपण प्रत्येकाला 'जरा वाट देतां का ? ' असें विचारून का आपली वाट काढीत असतो ? वाटेनें जात असतांना एकाएकीं पाऊस पडूं लागल्यास, एखाद्याच्या वळचणीच्या आश्रयानें आपण जे उभे राहतो, तें त्याला विचारून का उभे राहतो ? किंवा उन्हाच्या वेळीं घरांच्या सावलींतून जात असतांना त्या त्या घरमालकांना आपण विचारलेलें का असतें कीं, ' तुमच्या सावलींतून आम्ही जाऊं का ? ' असल्या परवानग्यांची आपणांला जरूरच भासत नाहीं. त्या साहेबांच्याजवळ पडून राहिलेलें मासिक उचलतांना आमची मनोभूमिका अशाच प्रकारची होती.

यों झालेल्या प्रसंगावर मल्लिनाथी करीत हलकेंच मला मेड्डॅडो ह्मणाले, ' दि डॉग इन दि मेंजर, ॲन्ड सच

डॉग्ज आर एव्हरीव्हेअर. ( गव्हाणींतील कुत्रा. असले कुत्रेच जिकडे तिकडे पहावयास सांपडतात )

' बरोबर आहे आपलें ह्मणणें. ' मी ह्मणालों.

' वैदिक काळांतील तुमच्या ब्राह्मणांनीं ज्ञानाचा मक्ता स्वतःकडे घेऊन गव्हाणींतील कुत्र्यासारखें वर्तन केलें असें मला वाटतें. ' प्रो. मेडूंडो ह्मणाले.

' आणि ही वृत्ति अजूनहि सर्वस्वी गेली आहे असें नका समजूं बरें का प्रोफेसर. ही वृत्ति आमच्या हाडींमांसीं खिळलेली आहे. आमच्याजवळ ज्ञान होतें व अजूनहि आहे. परंतु तें पसरविण्याची जी दिलदार वृत्ति पाहिजे ती आह्मांजवळ नाहीं. त्यामुळें मुळांत असलेलें ज्ञान पसरलें गेलें तर नाहींच, पण ज्यांच्याजवळ तें होतें त्यांच्याजवळहि तें गंजून निरुपयोगी झालें. गुरुशिष्यांच्या चाकोरींतच ज्ञानाची देवघेव झाल्यानें स्वार्थी कूपमंडूक वृत्ति बळावली. ती इतकी कीं, घरांतल्या आजीबाईला चार रामबाण औषधें माहीत असलीं तर तीं इतरांना सांगण्याऐवजीं तीं स्वतःबरोबर स्मशानांत घेऊन जाई. ' मेडूंडोसाहेबांच्या मताशीं संमत होत मी ह्मणालों.

'आमच्याकडेही असला पंथ एक वेळ होता. बायबलचें भाषांतर ग्रीक आणि लॅटिनखेरीज अन्य भाषांतून करावयाचें नाहीं, केलें तर तें धर्मबाह्य कृत्य होय, असें

म्हणणारा फार मोठा वर्ग होता. सुदैवानें हा वर्ग लवकरच नाहींसा झाला. बाकी अजूनहि कित्येक कारखानदार ज्या पद्धतीनें आपल्या धंद्यांतील रहस्यें गुप्त ठेवण्याचा प्रयत्न करतात, ती पद्धत ह्मणजे गव्हाणींतील कुत्र्यासारखीच होय. मला वाटतें, आपला हेतु जर शुद्ध असेल, तर ज्ञानाची पाणपोई ही सर्वदा आणि सर्वपंथीयांकरितां मोकळी ठेवल्यानें जगाचें कल्याणच होईल.'

'जी गोष्ट ज्ञानरूप धनाची, तीच गोष्ट साध्या धनाची. येथेंहि आपण म्हणतां तसलें कुत्रे भुंकत असलेले आढळतात.'

'भांडवलशाहीविषयीं ह्मणतो आहेस ना तूं? अगदीं बरोबर. दे आर दि वर्स्ट डॉग्ज. (हे कुत्रे तर फार भयंकर!) स्वतःच्या धनाचा स्वतः उपभोग घ्यावयाचें नाहींत व दुसऱ्यांना घेऊं द्यावयाचें नाहींत! कोणाकरितां हें धन जमा करीत असतात ईश्वराला माहीत. एखादे वेळीं वाटतें, फार चांगलें केलें राशियन लोकांनी! हा वर्गच मुळीं नाहींसा केला. रोगाचें बीज नाहींसें केलें.'

'बरेचसें धनिकांच्या वागण्यावर अवलंबून आहे, नाहीं का? उदाहरणार्थ, आपल्याच बडोदें संस्थानचें पहा ना. लोकांना सक्तीची पण फुकट विद्या, फुकट औषधें, फुकट पुस्तकालयें वगैरे दिल्यानें लोकांच्या ठिकाणीं दुजा भाव उत्पन्न झालेला नाहीं. मला वाटतें

र. शि. ५०२



सयाजीराव महाराज यांनीं हें तत्त्व फार चांगल्या रीतीनें ओळखलेलें दिसतें. आपल्या बागबगीच्यांचा व करमणुकीच्या साधनांचा लोकांनाहि उपभोग घेऊं देण्यांत त्यांनीं वर्गकलहाचें एक प्रकारें बीजच नाहींसें करण्याचा प्रयत्न केला आहे.'

'क्वाइट् राइट् माय बॉय. ( बरोबर बोललास ) एखाद्यानें ऐश्वर्याचा उपभोग क्वचित् घेतला तर त्याचें एवढें लोकांना कांहीं वाटत नाहीं. परंतु लोकांची आठवण मात्र त्यानें विसरूं नये. समजा, एखाद्या धनिकाजवळ नामांकित चित्रांचा, बहुमोल वस्तूंचा, किंमती जवाहिरांचा संग्रह आहे. अशा वेळीं त्यानें आपल्या पदार्थांचा अधून मधून जर आपल्या आश्रितांना व मित्रांना उपयोग करूं दिला, तर ते त्याला धन्यवादच देतील. पूर्वीच्या काळीं उमरावांविषयीं इतका द्वेषभाव नव्हता, याचें कारण ते आपल्या आश्रितांना आपल्या जवळील वस्तूंचा मर्यादित का होईना, उपयोग करूं देत असत. एका कुटुंबांत असल्यासारखें त्यांना त्या वेळीं वाटे. मी व माझें याची मर्यादा जितकी लहान, तितका असंतोष अधिक. मी व माझेंच अमुक गोष्टींचा उपयोग करायला अधिकारी इतर नव्हेत, असें म्हटलें कीं इतरांच्या मनांत ' तूं आणि तुझेंच कां ' असा प्रश्न स्वाभाविकच उत्पन्न होतो.'

'अगदीं खरें. स्वामित्वाच्या कल्पनेचें लोकांना एवढें वैषम्य वाटत नाहीं. परंतु तें स्वामित्व उदार स्वरूपाचें असायला हवें. माझ्या बंगल्यासमोर एखादा बाग फुलेलला असला, आणि त्यांतील फुलें तर राहोच पण साधें दर्शनहि मीं लोकांना जर वेऊं देत नसलों, तर त्यांनीं मनांतल्या मनांत माझें तळपट होवो असें न इच्छिल्यासच नवल !'

'सुंदर, बहुमोल, कलायुक्त, किंवा मानवी ज्ञानांत वा सुखांत भर घालणाऱ्या वस्तूंची मालकी कोणाचीहि असली तरी तिचा उपभोग व उपयोग सर्वांना घेतां-करतां यावा या मताचा मी आहे. एखाद्या चित्रसंग्रहालयाची किंवा पदार्थसंग्रहालयाची मालकी विशिष्ट व्यक्तीची असली, तरी त्याचा उपयोग सर्वांना करतां आला पाहिजे. एडिसन्, मारकॉनी, न्यूटन, आइनस्टाइन, सर जगदीश, सर चंद्रशेखरन्, इत्यादि व्यक्तींनीं लावलेल्या शोधांची मालकी त्यांच्याकडे खुशाल असो. परंतु त्याचा फायदा साऱ्या जगाला मिळणें अवश्य आहे. गव्हाणींतल्या कुत्र्यांसारखी जर या जगद्वंद्य विभूतींनीं आपली वागणूक ठेवली असती, तर जगाची आज दिसते आहे तेवढी प्रगति खचित झाली नसती. शंभर टक्के मालकीची कल्पना माझ्या मतें रानटी व हास्यास्पद आहे. 'मीं शिकार करून आणलेल्या रानडुकरावर माझी

एकट्याची मालकी, दुसऱ्याला त्याच्यांतील मासाभरहि मांस मिळावयाचें नाहीं '–ही जुनी, रानटी स्थिति दर्शविणारी मनोवृत्ति होय. तिच्यांत अजूनहि आपणांला बदल करावासा न वाटल्यास, आपल्यासारखे शहाणे आपणच म्हणावें लागेल. सुदैवानें कालाचा प्रवाह अशा दिशेनें वहातो आहे कीं, जागचे मुळींहि न हालणाऱ्यांची हकालपट्टीच होण्याचीं चिन्हें दिसताहेत.' असें म्हणत प्रो. मेड्डॅडो यांनीं आपल्या डोक्याच्या मागच्या भागावरून हलकेच हात फिरविला व डब्याच्या बाहेर दिसणाऱ्या निळ्या आकाशाकडे स्थिर नजरेनें ते पाहू लागले.

# लांब वेण्याच

एकदां एक जुन्या विचाराचे वृद्ध शास्त्रीबुवा माझ्या घरीं आले आणि नाकपुड्या फुगवून व डोळे वटारून मला म्हणाले, ' आपण हल्लीं हें मांडलंय् काय ? '

' काय मांडलंय् ? आपण खालीं बसाल काय ? ' मी शांतपणें म्हणालों.

' आतां बसायला आम्हांला जागाच कुठं आहे या भरतभूमीवर ? '

' या खुर्चीवर तर बसाल ? हं, आतां सांगा पाहूं काय झालं ? '

'काय व्हायचं बाकी राहलंय् ? आमचा धर्म बुडाला ! तुमच्यासारख्या मंडळींनीं जिकडे तिकडे कामुकतेचे अड्डे निर्माण केल्यावर धर्म उरणार कसा ? '

'म्हणजे मी समजलों नाहीं. कामुकतेचे अड्डे निर्माण केले म्हणतां ?'

'होय तेंच म्हणतों. कामुकतेच्या हौदांत स्त्रीपुरुषांनीं मनसोक्त अवगाहन करावं या स्वरूपाचं वाङ्मय आजकाल निर्माण होऊं लागलं आहे.'

'असं जर असेल तर आपल्याप्रमाणेंच मलाहि वाईट वाटेल.'

'वाइट वाटेल ! कळतात आम्हांला हे कावे. अलीकडे पोरीबाळी कशा प्रकारें नटतात हें पाहिलें आहे का आपण ?'

'पाहिलं आहे.'

'आपल्या मनाला तें पाहून समाधान वाटत असेल ?'

'वावगं कांहीं वाटत नाहीं.'


'कशाला वाटेल ? कामुकतेचा प्रसार व्हावा अशी जिथं प्रामाणिक इच्छा, तिथं वावगं काय वाटणार आहे ? आम्हांला मात्र हें सर्व पाहुन वाईट वाटतं. या देवभूमीचं रूपांतर गटारांत होत असलेलं पाहून आमचं अंतःकरण शतशः विदीर्ण होतं.'

'आतां मुद्दा सांगाल काय ?'

'मुद्दा सांगण्यापूर्वी सुधारणावादी लोकांना गुद्दा द्यावासा वाटतो.' रागावून शास्त्रीबुवा म्हणाले.'

' त्यानं मुद्दा थोडाच पटणार आहे ? '

'आमचं म्हणणं असं. वाङ्मय, वाङ्मय म्हणून ज्याला तुम्ही म्हणतां त्यांत कामुकतासंवर्धनाखेरीज कांहीं नसतं. या वाङ्मयाचा परिणाम पोरींबाळींवर होऊन कामुकतेचं संवर्धन होईल अशा प्रकारची केशभूषा व वेषभूषा त्या करतात. '



' म्हणजे मी समजलो नाहीं.

[ चित्रकार–गोलिवडेकर ] पृ. १११

‘ असं जर असेल तर ती वाईट गोष्ट होय. ’



‘ असंच आहे. या घोडनवऱ्यांचे चाळे तर पहा ! विनाकच्छ पातळ, विनबाह्यांचं पोलकं, तोंडावर पॉवडर, आणि या सर्वावर कहर म्हणून नितंबावर लोळत असलेली लांब वेणी-या वेष-केश-भूषेच्या पोरी पाहिल्याच असाल आपण ? ’

‘ पाहिल्या आहेत. ’

‘ आणि पाहूनहि पुन्हा शांतच ? मी तर संतापानें लाल होतों. ’

‘ आणि ह्मणूनच आपणाला तिथें कामुकता दिसते. शांतपणानें आपण विचार कराल तर आपलं मत पालटेल. ’

‘ असें नाहीं. संतापामुळें कामुकता प्रतीत होत नसून, कामुकतेमुळें संताप उत्पन्न होतो. या लांब वेण्यांकडे पाहून माझ्या सारख्या वृद्धाच्या मनाची स्थिति देखील चमत्कारिक होते, मग तरुणांची काय गोष्ट ! पाठीवर लोळणाऱ्या या नागिणींकडे पाहिलं, कीं वाटतं आतां या कोणाचा चावा घेणार आणि कोणाचा नाहीं ! पाहणाऱ्याच्या गळ्यांभोंवतीं वेटाळें मारणाऱ्या या फांसांकडे पाहिलं कीं वाटतं आर्य स्त्रियांचा केवढा हा अधःपात ! पूर्वीचं तें खापरीसारखें सकच्छ जाड लुगडं कुणीकडे आणि सर्वांगाला आंतून डोकावून पाहूं देणारीं आधुनिक पातळं कुणीकडे ! पूर्वींच्या कोंपरापर्यंत बाह्या असणाऱ्या धारवाडी खणाच्या चोळ्या कुणीकडे, आणि बिनबाह्यांची तुमचीं जंपर्स कुणीकडं ! मूद, अग्रफूल वगैरे घालून कसलेली पूर्वींची सौभाग्यवतीची वेणी कुणीकडं, आणि पाठीवर लोळणारे आधुनिक कुमारिकांचे शेपटे कुणीकडं ! जिकडे तिकडे कामुकता आणि अधःपात, दुसरें कांहीं नाहीं ! शिव शिव ’ कानावर हात ठेवीत शास्त्रीबुवा म्हणाले.

शास्त्रीबुवांच्या बोलण्यांत आणि विचारांत इतके तर्कदोष होते, कीं त्यांच्याशीं हुज्जत घालण्याऐवजीं मीं मला काय वाटतें तें सांगून त्यांच्यापासून स्वतःची सोडवणूक करून घेतली. परंतु त्यांच्या मनोवृत्तीचे लोक कांहीं कमी पाह्यला सांपडतात असें नाहीं.

या सर्वांचें चुकत असेल तर तें यांत, कीं ते स्वतःच्या दूषित पूर्वग्रहाच्या काळ्या चष्म्यांतून जगाकडे पहात असल्यामुळें त्यांना सर्वत्र काळोख आणि अधःपात हीं दिसतात. त्यांच्याजवळ नसतें विचारांचें औदार्य कीं दृष्टीची विशालता. कावीळ झालेल्यानें सर्व जग पिवळें आहे असें म्हणावें, तद्वत कामुकतेची कावीळ जडलेल्या या लोकांना सर्वत्र तिचें प्रदर्शन पसरलेलें दिसतें. हा दोष जगाचा नसून त्यांचा आहे हें ते विसरतात. आमचे शास्त्रीबुवा स्त्रियांच्या वेष नी केशभूषेला कामुक म्हणतात, तेव्हां त्यांच्याच मनोवृत्तींत कांहीं तरी दोष असला पाहिजे.

कपडे घालण्याची चाल केव्हांपासून अमलांत आली असेल ती असो, परंतु सुरवातीला तरी लज्जारक्षणापेक्षां शीततापादिकांपासून शरिराच्या रक्षणाकरितां वस्त्रांचा उपयोग करणांत येत असावा. प्रथम उपयुक्तता आणि नंतर सौंदर्य, या तत्त्वाप्रमाणें कपड्यांतहि सौंदर्याची दृष्टि मागाहूनच आलेली आहे. हल्लींच्या



वेषभूषेच्या बाबतींत उपयुक्तता आणि सौंदर्य याचा सुंदर माणिकांचन-योग जमल्यासारखा दिसतो.

काळांत खादी आणि धावळ्या वापरणाऱ्या कांहीं थोड्या लोकांखेरीज बहुजनसमाजांत वेषभूषेच्या बाबतींत उपयुक्तता आणि सौंदर्य यांचा सुंदर मणिकांचनयोग जमल्यासारखा दिसतो.

असे कांहीं भाबड्या मनाचे आणि कोंवळ्या अंतःकरणाचे लोक असतात, कीं त्यांना उपयुक्ततेंत पावित्र्य आणि सौंदर्यांत कामुकता दिसते. खादी पेहरून किंवा धावळी नेसून जर तुह्मी भलती माडी चढलांत तर ते गोरक्षणाचा फंड जमविण्याकरितां चढलांत असें ते प्रामाणिकपणें मानतील. याच्या उलट आमच्या शास्त्रीबुवांनीं वर्णन केलेल्या वेष नी केशभूषेच्या मुलींबरोबर तुह्मी बोललांत तरी त्यांत कामुकतेखेरीज दुसरें कांहीं असणेंच शक्य नाहीं असें त्यांना हमखास वाटेल. गरीब बिचारे!

स्त्री–पुरुषांच्या वेषभूषेंत परस्परांना आकर्षक वाटण्याजोगा कांहीं भाग असतो यांत शंका नाहीं. आपण कोणाच्या तरी नजरेंत भरावें, आपल्याविषयीं कोणाचें तरी चांगलें मत व्हावें, या उद्देशानें कित्येक वेळां वेष नी केशभूषा केली जाते हें मला मान्य आहे. आणि असें करण्यांत कांहीं वावगें आहे असेंहि नाहीं. फार अनादिकालापासून परस्पराकर्षणाच्या या गोष्टी चालत आल्या आहेत व पुढेंहि चालतील. अगदीं रानटी अवस्थेंतील स्त्रीपुरुषांनीं देखील अंगावर रंग वा पिसें

लावून आकर्षणाचें हें कार्य उरकून घेतलेलें आहे व अजूनहि घेत आहेत. जिथें हींदेखील साधनें उपलब्ध नसतील तिथें अंगविक्षेप किंवा विभ्रम यांचा उपयोग स्त्री—पुरुषांनीं केलेला आढळेल.

पण म्हणून प्रत्येक वेष नी केशभूषेच्या आणि अंगविक्षेपाच्या बाबतींत कामुक आकर्षणच असेल हें म्हणणें भयंकर धाडसाचें ठरेल. चांगला पोषाख करण्यांत दुसऱ्याला आपण चांगलें दिसावें हा उद्देश जितक्या अंशांनीं असेल, तितक्याच किंवा त्याहूनहि अधिक अंशांनीं स्वतःला चांगलें वाटण्याचाहि उद्देश असूं शकेल व असतो. म्हणजें असें कीं वेषभूषेंत पररंजनाचा जितका भाग असतो त्याहींपेक्षां अधिक भाग आत्मरंजनाचा असतो. किंबहुना कांहीं कांहीं आयुष्याच्या अवस्थांतून आत्मरंजनच या बाबतींत अधिक आढळतें.

माझ्या चार वर्षांच्या लहान मुलाला दिवसांतून तीन वेळां कपडे बदलण्याची हौस आहे. प्रत्येक वेळीं तो आपल्या सद्र्याची, पॅंटची, तारीफ करीत कपडे बदलत असतो. आणि असें करीत असतांना तो स्वतःवर निहायत खूष होतो. या त्याच्या वेषभूषेंत पररंजन मानावयाचें, कामुकता मानावयाची, कीं नुसतें आत्मरंजनच मानावयाचें ?

माझ्या घरासमोर एक साठी उलटलेले सद्गृहस्थ रहातात. चांगले देव नी धर्मभोळे आहेत ते. बाहेर जातानां ते इतके सजून जातात कीं त्यांच्यापुढें कॉलेजांतील युवकाची वेषभुषा फिक्की ठरावी. त्यांचें रेशीमकांठी धोतर, सिल्कचाकोट, गळ्यांभोंवतीं असलेलें करवतीकांठी उपरणें, डोक्यावर ठेवलेली पुणेरी पगडी आणि या सर्वांवर ताण म्हणून मिशांना केलेला कलप, या वेष नी केशभुषेनें विभुषित होत्साते ते जेव्हां देवदर्शनाला संध्याकाळीं जातात, तेव्हां मला वाटतें, या सर्व खटाटोपांत पररंजन आहे कीं साधें आत्मरंजन आहे ? मला वाटतें, यांत आत्मरंजनच अधिक असावें.

अगदीं तरुण–तरुणींच्या वेषभूषेचा विचार केला तरी त्यांत आत्मरंजनच अधिक असतें असें मला वाटतें. आजन्म विवाहित रहाण्याची प्रतिज्ञा घेतलेले व ती पालन केलेले कितीतरी स्त्रीपुरुष मला ठाऊक आहेत ! त्यांच्या आकर्षक वेषभूषेकडे जेव्हां मी पहातों तेव्हांतर माझी खात्रीच पटते कीं, यांत पररंजन किंवा कामुक पराकर्षण नसून साधें आत्मरंजनच आहे.

आणि हें उघडच आहे. आत्मरंजनाची लज्जत किंवा गोडी ही कांहीं और आहे. आरशांत स्वतःच्या प्रतिबिंबाकडे तासन्तास बघणारे कितीतरी चांगले लोक मला माहीत आहेत. ज्याचें किंवा जिचें शरीर सुदृढ नी सुरेख

असेल त्याला किंवा तिला आरशांत स्वतःच्या मुखाकडे आणि शरिराकडे पाहून आनंद झालाच पाहिजे. पाण्यांत स्वतःचें प्रतिबिंब पाहून स्वतःवरच प्रेम करूं लागलेल्या नारसीससची कथा या दृष्टीनें उद्बोधक आहे.

वेषभूषेच्या बाबतींतहि हेंच सांगतां येईल. स्वतःच्या आनंदाकरितां पुष्कळ वेळां आपण तिच्याकडे अधिक लक्ष पुरवितों. मी जेव्हां परीटघडीचें कपडे घालतों, केंसांना सुवासिक तेल लावून ते विंचरतों, पायांत चांगलेसें पादत्राण चढवितों, त्या वेळीं इतरांना काय वाटत असेल हें मला माहीत नाहीं, परंतु मला मात्र कमालीचा आनंद वाटतो. ज्या दिवशीं असें कांहीं करायला मी विसरतों, तेव्हां मला अकारणच बेचैन किंवा कसेसेंच वाटतें. चांगल्या वेषभूषेचा आपल्या मनोवृत्तीवर चांगल्या हवेइतकाच परिणाम होतो.

आणि जी गोष्ट पुरुषांची, तीच स्त्रियांची. चांगल्या वेष नी केशभूषेनें त्यांना झाला तरी आनंदच होत असेल. पूर्वी शाळेंत जाणाऱ्या मुली आणि अलीकडच्या मुली, यांत मला प्रामुख्यानें हाच फरक आढळतो. पूर्वीच्या मुली वेषभूषेंतील दुर्लक्षामुळें बावळ्या आणि वेंधळ्या दिसत. त्याच अलीकडच्या मुली पहा कशा चणचणीत नी सुरेख दिसतात. त्यांच्या आनंदी चेहऱ्यांकडे पाहिलें असतांना, त्या आनंदाचें मर्म रंगसंगतीकडे लक्ष

देऊन केलेल्या वेषभूषेंत अगर पाठीवर क्रीडा करणाऱ्या लांब वेणींतच आढळेल. आणि मग आपण खचित असें म्हणाल, शास्त्रीबुवांना काय वाटेल तें त्यांनीं म्हणावें, परंतु त्यांचा ज्यांच्यावर कटाक्ष त्या कुमारिकांनीं आपल्या वेषभूषेकडे अगदीं जरूर लक्ष द्यावें. आत्मरंजन हें आत्म-बोधाइतकेंच महत्त्वाचें आहे.

प्र. नं. ६०२

# म्हातारपण

तो तास शेक्सपियरकृत ‘ मिडसमर नाइट्स ड्रीम ’ हें नाटक शिकविण्याचा होता. त्या प्रसंगीं कळीच्या नारदाप्रमाणें शोभणाऱ्या विनोदमूर्ति ‘ पक ’ च्या कारस्थानांचें वर्णन चाललें असतांना, पकनें म्हाताऱ्या बायकांना दिलेल्या त्रासाचें मजेदार वर्णन वाचण्याचा सुयोग आला. त्यावेळीं, तुम्हांला “ म्हातारं व्हावसं नाहीं वाटत ? ” असा मीं सर्व मुलींना उद्देशून प्रश्न केला. त्यावेळीं फार गंमतीचीं उत्तरें मला ऐकायला मिळालीं.

“ म्हातारं ? इश्श ! ” विचार करायला देखील कोणी तयार नाहीं, अशा आविर्भावानें पहिली मुलगी उद्गारली.

स्. ग्री. ८०२



" कोणीसं केलं आहे ना वर्णन ? अंगं गलितं—"

" होय ग होय. पलितं मुंडं ! दशन विहीनं जातं तुंडम् ! " दुसऱ्या मुलीच्या विचारांना पाठिंबा देत तिसरी एक मुलगी ह्मणाली.

"आपण नाहीं ग बाई काठी टेंकीत टेंकीत जायला तयार. " चौथी मुलगी ह्मणाली.

" ती आशाहि नको, आणि तें लाजिरवाणं ह्मातारपणहि नको " पांचवी मुलगी ह्मणाली.

" कसलं तें जिणं ! शी ! " पुनः पहिली मुलगी उद्गारली.

" काळे केस पांढरे झालेले बघण्यापेक्षां, ते पांढरे होईपर्यंत न जगलेलेंच बरें. " दुसरी मुलगी ह्मणाली.

" गडकऱ्यांनीं म्हटलं आहे ना ? जगण्याजोगं आपल्याजवळ जोंपर्यंत कांहीं असेल तोंपर्यंतच मरण्यांत मौज आहे. मला तर मी सुंदर दिसत असतांनाच मरण आलेलं आवडेल. " तिसरी मुलगी आपले केस कोमल हाताच्या सुकुमार बोटांनीं ऐटीनें बाजूला सांवरीत असतांना ह्मणाली.

" ह्मातारपण बघणं ह्मणजे तुकारामानं ' आपुलें मरण पाहिलें मी डोळां ' असें जें ह्मटलें आहे तसेंच करणें होय. कोणीं धड आपल्याशीं बोलणार नाहीं कीं

कांहीं नाहीं. तोंडाचं बोळकं घेऊन एखाद्या कोंपऱ्यांत बसण्याची कल्पनाहि मला असह्य वाटते." चौथी मुलगी आंबट चेहेरा करीत उद्गारली.

"मग तुह्मांला कोणालाच ह्मातारं नाहीं व्हावसं वाटत तर ?" मी विचारलें.

"नाहीं, नाहीं. मुळींच नाहीं." असा संमिश्र आवाज वर्गांत घुमूं लागला.

"पण समजा तुह्मी ह्मातान्या झालांत तर ?" पुनः प्रश्न टाकून मी मुलींना चिडवून पाहिल्या.

"आह्मीं होणारच नाहीं ह्मातान्या." पहिली मुलगी ह्मणाली. या तिच्या बोलण्यानें मला हंसूं आवरेना.

"पण सर, तुह्मांला तरी ह्मातारं व्हावसं वाटतं का ?" माझ्या हंसण्यानें किंचित् बावरल्यासारखी होऊन दुसरी मुलगी ह्मणाली.

"अलबत्. कां नाहीं. माझी तर अशी मनीषा आहे कीं आपण खूप वृद्ध व्हावें. आणि पांढरी दाढी वाढवावी. पांढऱ्या भुवया, पांढऱ्या पापण्या, पांढरे केस झालेलीं वृद्ध मंडळी पाहिली कीं मला पराकाष्टेचें समाधान वाटतें." मी हंसत ह्मणालें.

"कांहींतरीच" एक मुलगी ह्मणाली. आणि मग बाकीच्या सर्वजणी 'खो खो खो' करून हंसल्या.

मीहि त्यांच्या हंसण्यांत सामील झालों, आणि त्या दिवशीं आमचा तास तेथेंच संपला.

परंतु तास जरी संपला तरी माझ्या डोक्यांत सुरू झालेलें विचारचक्र कांहीं केल्या थांबेना. वर्गातील मुलींना म्हातारपणाविषयीं वाटणारा तिटकारा पाहून मला आश्चर्य वाटलें. म्हातारपणीं आपलें शरीर दुर्बल बनतें, म्हणून का त्यांना म्हातारपण नकोसें वाटतें ? कांहीं कांहीं म्हातारी मंडळी शरीरानें जर्जर झालेलीं असतात हें खरें. परंतु आपण जर प्रयत्न केला तर सामान्यपणें निकोप शरीर आपणाला खचित राखतां येईल. चांगले ऐंशी वर्षांचे झाले असूनहि टुणटुणित असलेले किती तरी म्हातारे मी पाहिले आहेत. त्यांचे दुधाचे, दह्याचे वगैरे सर्व दांत पडून त्यांपैकीं कांहींकांना नवीन ' दातऱ्या ' आलेल्या आहेत. आणि त्या आनंदांत ते कशाचीहि पर्वा करीत नाहींत. कांहीं कांहीं म्हाताऱ्या देखील शरीरानें ठणठणीत अशा मी पाहिल्या आहेत. जुन्या भाषेंत सांगावयाचें म्हणजे वीस पंचवीस पानांचा स्वयंपाक त्या अजूनहि करूं शकतात. आणि आहार म्हणाल तर तोहि कांहीं कॉलेजियन तरुणींना लाजविणारा असा आहे. निसर्गाचा असा कांहीं नियम नाहीं कीं म्हातारपणीं मनुष्यानें अंथरुणावर झिजत पडावें. पिकलेलें पान कुजतांना कोणी पाहिलें आहे का ? परिपक्व झाल्याबरोबर

त्याचें देठच मुळीं फांदीपासून वेगळें होतें. तसेंच मनुष्याचें. जीर्ण ह्मणजे परिपक्व झालेल्या शरीरांतून आत्मा असाच मजेनें निघून जातो.

शारीरिक दुबळेपणाला कंटाळून माझ्या विद्यार्थिनींना ह्मातारपण नकोसें झालें म्हणावें तर तोहि मुद्दा फारसा भरीव नाहीं. मग काय म्हातारपणीं सौंदर्य नाहींसें होईल या भावनेनें का त्या म्हातारपणाला त्रासल्या असाव्यात ? ज्याच्याजवळ रूपसंपदा आहे त्याची रूपसंपदा–शरीर निकोप राहिल्यास–म्हातारपणीं नाहींशी होण्याचा संभव नाहीं. पुष्कळांनीं सुस्वरूप म्हातारे स्त्रीपुरूप पाहिले असतील.

आणि तसाच विचार केला तर सौंदर्याचा मुद्दा थोडा गौणच मानला पाहिजे. कारण खरोखर रुपवती स्त्रिया किंवा देखणे पुरुष फारच थोडे असतात. आणि समजा एका मुलीला वाटलें त्याप्रमाणें वृद्धापकाळीं सौंदर्य कमी होत असलें, तरीहि त्यांत काय झालें ? शारीरिक सौंदर्य म्हणजेच कांहीं जीवनसर्वस्व नाहीं. फुलाच्या आंत जसा सुगंध असतो, तसेंच मनुष्याच्या शरीरामध्यें मन असतें. आणि त्याचें सौंदर्य कमालीचें विलोभनीय असूं शकते.

इतकेंच नाहीं तर हें मानसिक सौंदर्य वृद्धापकाळीं अधिक पूर्णावस्थेला गेलेलें असण्याचा संभव असतो. समीप येणाऱ्या मृत्यूला भिऊन म्हणा, अगर आयुष्यांत

दु:खाचे प्रसंग अधिक बघितल्यामुळें म्हणा, म्हातारपणीं मनुष्याच्या भावना बहुतेक कोमलतर बनलेल्या असतात. ( अर्थात् याला कांहीं कांहीं म्हातारे व म्हाताऱ्या अपवाद असतात हें मला कबूल आहे. पण असल्या दुराग्रही कट्टर वृद्धमंडळींना त्याचें फळहि भोगावें लागतें. ) सामान्यपणें म्हातारे लोक कृतीनें तर राहोच पण शब्दानें देखील एखाद्याला दुखवायला तयार नसतात. आपल्या आयुष्यांत आलेल्या विविध अनुभवांचा फायदा आपल्यापेक्षां लहान असलेल्या मंडळींना द्यायला ते सदैव तयार असतात. दुसऱ्याच्या आनंदांत आनंद मानतां येण्याजोगा जर कुठला खरोखर काळ असेल तर तो वृद्धापकाळच होय.

मनुष्यानें आपल्या स्वत:चाच विचार केला तरी देखील, एक अनुभव म्हणून का होईना, म्हातारपण जगून बघण्याजोगें खचित् असतें. संसाराचा आणि इतरहि खटाटोप बाजूला सारून जगाकडे शांतपणें, निर्विकारपणें, निस्वार्थपणें बघण्याचा हाच काळ असतो. जगांतील स्वार्थी व्यवहार इतक्या तीव्रतेनें आणि झपाट्यानें चाललेले असतात कीं मनुष्यानें क्षणभर थांबून आजूबाजूला पाहावयाचें म्हटलें तरी देखील त्याला तसें करणें स्वार्थाच्याच दृष्टीनें शक्य नसतें. आपण आहोंत कुठें, करतों काय, जग चाललें आहे कुठें वगैरे गोष्टींचा

निवांतपणें विचार याच काळांत चांगल्याप्रकारें करतां येतो. तसेंच आपल्या परिपक्व ज्ञानाचा व अनुभवाचा उपयोगहि इतरांना याच वयांत करून देतां येतो.

या गोष्टीला परिस्थितिहि अनुकूल असते. सामान्यपणें वृद्ध मंडळींना मान देण्याची प्रवृत्ति सर्व लोकांत असते. आपण घरांतील व घराबाहेरील तरुणांना त्रास न दिला तर तीं तळहाताच्या फोडाप्रमाणें देखील आपणांला झेलायला तयार होतील. थोडासा उदारपणा आणि प्रेमळपणा माणसाजवळ असला तर त्याला म्हातारपणासारखा मौजेचा काळ आढळणार नाहीं. म्हातारपणीं इतरांकडून सेवा इतकी करून घेतां येते कीं कांहीं पुसूं नका.

माझ्या माहितीचे एक वृद्ध पेन्शनर आहेत. ते बसतात त्याच गादीजवळ त्यांची चंची, पिकदाणी वगैरे वस्तु असतात. तरी देखील, "अरे कोण तिकडे आहे ? तेवढा पानाचा डबा सरकवा पाहूं. जरा पिकदाणी जवळ करता का ? आतां आम्ही म्हातारे झालों," असें म्हणून ते घरांतल्या मंडळींकडून कामें करून घेतात. स्नान करतांना त्यांची अशीच मौज असते. एका हातापेक्षां ज्यास्त अंतरावर रुमाल किंवा धोतर असूनहि ते म्हणतात, "चला म्हाताऱ्याला रुमाल कोण देतो आहे ? धोतर कोण देतो आहे ?" हीं त्यांचीं कामें त्यांना सहज करतां

येण्याजोगीं असूनहि त्यांच्या प्रेमळ व निरुपद्रवी स्वभावामुळें, तीं करतांना त्यांच्या घरांतील कोणालाहि त्यांचा कंटाळा येत नाहीं. उलट त्यांचीं कामें करायला सांपडावींत म्हणून घरांतल्या मंडळींत चुरस लागलेली असते.

कुठलाहि आणि कोठेंहि समारंभ असो. त्यांत पांढऱ्या कसांना पुढें बसण्याचा मान सहजच मिळतो. पानसुपारी किंवा अत्तरगुलाब हीं प्रथम म्हाताऱ्या मंडळींना वाटतात. लग्नकार्यांत पहिल्या नमस्काराचे धनी वृद्धच. लग्नसमारंभाच्या वेळीं किंवा इतरहि प्रसंगीं सुस्वरूप तरुणींकडे निःशंकपणें आणि मनसोक्तपणें जर कुणाला बघतां येत असेल तर ते वृद्धांनाच. ज्यांच्या डोळ्यांना हा उद्योगच लागला आहे असे किती तरी रसिक म्हातारे मला माहित आहेत. ते म्हणतात, " एकदां श्रीकृष्णानें देखील आमचेंच सोंग घेऊन रुक्मिणीची भेट घेतली होती. अहो हें म्हातारपण फार मजेशीर आहे. तुम्ही म्हातारे झालांत कीं त्याचे फायदे तुमच्या लक्षांत येतील. "

त्यावर मी म्हणत असतो, " तुम्ही म्हणतां तें खरें असेल. पण हल्लीं तरुण देखील निःशंकपणें, बेडरपणें तरुणींकडे बघू लागले आहेत. "

माझें बोलणें ऐकून म्हातारे हसूं लागतात आणि म्हणतात, " खरं का ? एखाद्या बाईकडे डोळे वर करून बघण्याची आमची छाती होत नसे लहानपणीं. "

जेवणाखाण्याच्या बाबतींतहि म्हाताऱ्यांची जेवढी मिजास राखली जाते, तितकी दुसऱ्या कोणाचीहि राखली जात नाहीं. चावायला जड वाटणारे पदार्थ म्हाताऱ्यांना वाटून वा कुटून मिळतात. स्निग्ध व सात्त्विक पदार्थ म्हणजे कुठें तूप आहे, लोणी आहे, दूध आहे, द्राक्षें आहेत, केळीं आहेत—हीं म्हाताऱ्यांच्याच मत्त्याचीं असतात.

आणि हें सर्व मिळवायला कांहीं प्रयास पडतात का ? मुळींच नाहीं. कुठल्याहि गोष्टीचा फारशा गंभीरपणें विचार करावयाचा नाहीं, सर्व गोष्टींकडे गमतीनें, बालिशवृत्तीनें बघावयाचें, घरांतल्या व्यवहारांत मुळींच ढवळाढवळ करावयाची नाहीं, सुनबाई किंवा चिरंजीव यांच्या कारभारांत दखलगिरी करावयाची नाहीं, असें ज्यांनीं म्हातारपणचें ब्रीदवाक्य बनविलेलें असतें, अशांना सर्व गोष्टी सुकर होतात. प्रेमानें अराजकांवर देखील राज्य करतां येतें तें असें.

कांहीं म्हाताऱ्यांची मोठी अनुकंपनीय स्थिति होते. याचें कारण तेच आणि त्यांची वागणूक हीं होय. म्हातारपणीं दुराग्रही, हट्टी किंवा चिडका स्वभाव बनला तर मात्र दुर्दशेला पारावार नसतो. पण याला कोण काय करणार ?

समाप्त

# फेरफटका

रसिकांनीं व टीकाकारांनीं एकमुखानें वाखाणलेला
लघुनिबंधसंग्रह.

सचित्र, पृष्ठ संख्या ११९ ] [ किंमत १ रुपया.

## — कांहीं अभिप्राय —

समाजजीवनावरील टीका तुमच्या लघुनिबंधांत आहे. ती एकेरी नसून सामान्य माणसाला पदोपदीं येणाऱ्या व्यावहारिक प्रश्नांवर बोधात्मक उत्तरें देणारी आहे....तुमचें पुस्तक अत्यंत वाचनीय झालें आहे.

—तात्यासाहेब केळकर

* * *

अत्यंत परिचित विषयाकडे नाविन्याच्या नव्हाळीनें बघण्याची प्रो. दांडेकरांची प्रवृत्ति, गंभीर विवेचनाचा ओझरता वासहि वाचकांना लागूं नये या विषयीं त्यांनीं दाखविलेली दक्षता, आयुष्याकडे बघण्याचा त्यांचा प्रसादपूर्ण दृष्टिकोण, साधी, गोंडस व घोंसदार भाषा—आणि या सर्व गुणांवर विनोदाच्या अत्तरदाणीं-तून शिंपडलेलें गुलाबपाणी—यामुळें—' हा फेरफटका ' मराठी वाङ्मयांतील आजपर्यंतच्या लघुनिबंधसंग्रहांत अपूर्व ठरला जाईल याविषयीं मला शंका वाटत नाहीं.

—प्र. के. अत्रे

Thanks very much for having sent me a copy of your **very pleasant** " walks "

**—N. S. Phadake**

*  *  *

प्रो. दांडेकर यांची दृष्टि जशी बारीक तशीच विनोदी आहे; व त्यांच्या वर्णनांत सहानुभूतीचा जिव्हाळा असल्यामुळें तो विनोद मर्मभेदक वाटत नाहीं.

**—महाराष्ट्र**

*  *  *

भाषेचा सुटसुटीतपणा, कथनकौशल्य, मधून, मधून खेळणारे विनोदी वारे यामुळें व विषय हाताळणाऱ्या सहज सुंदर पद्धतिमुळें हें पुस्तक जितकें उद्बोधक तितकेंच तें मनोरंजक झालें आहे. हा निबंधसंग्रह तरुणांना स्वतंत्र विचार करण्यास लावील यांत शंका नाही.

**—चित्रा**

*  *  *

एकेका वाङ्मयप्रकाराचा पुरस्कर्ता आणि प्रतिनिधी म्हणून कांहीं लेखकांची वाटणी करावी लागते. आणि त्या वाटणीत प्रो. फडक्यांच्या वांट्यास जसा कादंबरीचा सवता सुभा येईल, प्रि. अत्रे यांना विडंबनात्मक कवितांचा, प्रो. जोशी यांना विनोदी लिखाणाचा, तसा प्रो. दांडेकर यांना लघुनिबंधाचा स्वतंत्र आणि सवता सुभा द्यावा लागेल.

**—यशवंत**

प्रो. दांडेकरांचा हा 'फेरफटका' जसा मनोज्ञ आहे तसा तो उत्साहपूर्ण आहे. त्यांच्या भाषेंत व मांडणींत अदम्य उल्हास खेळत आहे आणि तो वाचकांना आल्हाददायक वाटेल यांत शंका नाहीं.

—चित्रमयजगत

* * *

तात्यासाहेब केळकरांबरोबर कोणीहि मनुष्य प्रो. दांडेकरांना सांगूं शकेल कीं तुमचें पुस्तक अत्यंत वाचनीय झालें आहे.

—प्रभा

* * *

सर्व निबंधांत लेखकाच्या मनुष्य स्वभावाचें सूक्ष्म व मार्मिक निरीक्षण शक्तीचें व व्यवहारांत हरघडी उपयोगी पडेल अशा सामाजिक तत्वज्ञानाचें प्रतिबिंब पडलें आहे. प्रो. दांडेकर यांची भाषा सुबोध व प्रसादपूर्ण असून, ती विनोदाचें लेणें ल्यायली असल्यामुळें एकंदर पुस्तक अतिशय मनोरंजक व बोधप्रद झालें आहे. असे आदर्श लघुनिबंध क्वचितच पहावयास सांपडतील.

—ज्ञानप्रकाश

* * *

प्रो. दांडेकर यांच्या अंगांत लघुनिबंधकारास अत्यावश्यक अशा–आनंदी व मोकळी वृत्ति, चौरसपणा, आशावादित्व, विद्वत्ता, रसिकपणा हे सर्व गुण गोडपणानें खेळविणारी साधी, घोंसदार भाषा–सर्व गुणांचें मिलन झालें असल्यामुळें यांतील बहुतेक निबंध वाचनीय व आनंददायक झाले आहेत यांत संशय नाही.

—सह्विचार

ताज्या रक्ताच्या तरुणांतील आशावाद प्रो. दांडेकर यांच्या ठायीं भिनला असून त्याचे पडसाद या फेरफटक्यांत सर्वत्र उमटले आहेत.

—वसुंधरा

*　　　　*　　　　*

'मागें वळून पाहिलें असतां' पाहिलेलाच भाग रम्यतर कसा दिसतो याचा अनुभव या फेरफटक्यानें खचित् येईल. असें करण्यांत 'शक्तीचा अपव्यय' होईल ही धास्ती नको. उलट मुरलेला पदार्थ अधिक खमंग लागतो अशीच वाचकांची खात्री पटेल.

—किर्लोस्कर

*　　　　*　　　　*

आपल्या मार्मिक आणि विनोदी पद्धतीनें वाचकांवर एक-प्रकारें मोहिनी घालून आपल्या लेखनांत समरस करून टाकण्याची कला लेखकाला चांगलीच अवगत असल्याचें स्पष्ट दिसतें,

—कप्तान

# प्रो. दांडेकर यांचीं इतर पुस्तकें

| | | | |
|---|---|---|---|
| १. | कळ्यांची माळ ( लघुकथासंग्रह ) | १–०–० |
| २. | आजच्या कळ्या ( „ „ ) | ०-१०-० |
| ३. | चारित्र्यसुधा ( कादंबरी ) | २–०–० |
| ४. | केळकरांचीं सहा नाटकें ( प्रबंध ) | १–४–० |
| ५. | श्रीमंत सयाजीराव महाराज ( चरित्र ) | ०–८–० |
| ६. | अर्जुन ( चरित्र ) | ०–६–० |
| ७. | निवृत्तिविनोद ( भाषांतरित ) | १–८–० |
| ८. | भारतीय समाजस्थिति ( भाषांतरीत ) | १–४–० |
| ९. | फेरफटका ( लघुनिबंधसंग्रह ) | १–०–० |

पुस्तकें लेखकाकडे ' दांडिया बाजार, बडोदें. ' या पत्त्यावर किंवा सर्व प्रसिद्ध पुस्तकविक्रेत्यांकडे मिळतील.

# प्र ता र णा

# वा ता हा त

प्रो. दांडेकर या दोन यांच्या विचारप्रवर्तक
व मनोरंजक कादंबऱ्या लवकरच
प्रसिद्ध होतील.